|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

वर्ष : १३ | अंक : १५ | सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ ते रविवार दि. २७ एप्रिल २०२५ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## शुल्लक वादातून भयंकर सुडाने पेटला कृतघ्न मुलाने आईचाच जीव घेतला

सांगोला/क्राईम रिपोर्टर

आजकालची मुले इतकी कृतघ्न झालेली आहेत कि त्यांना जन्मदात्या आई-वडिलांच्या उपकारांची जाणीव राहिलेली नाही. आई वडिलांना नेहमीच मुलाच्या भविष्याची चिंता असल्याने आपल्या मुलांनी चांगले वागावे यासाठी मुलांना त्यांच्याकडून समजुतदारीच्या चार गोष्टी सतत सांगितल्या जात असतात. पण त्याचाच मुलांना राग येतो. सांगोला तालुक्यातील कडलास गावात आई वडिलांचा उपदेश पचनी न पडल्याने एका कृतघ्न मुलाने आईची ...पान २ वर

## समलिंगी संबंधाचे गुपित फुटताच भितीने घाबरून गेले ज्याने पाहिले त्याला ठार मारून मृतदेहाचे तुकडे केले



मयत माऊली गव्हाणे





आरोपी सागर गव्हाणे

अहिल्यानगर/क्राईम रिपोर्टर

भारतीय संस्कृतीला सभ्यतेची किनार आहे. परंपरांची मर्यादा आहे आणि त्याच बरोबर पाप पुण्याची कुठेतरी भीती आहे. त्यामुळे आजही लैंगिक विषयवार आजही उघडपणे बोलायला लोकांना संकोच वाटत असायचा पण हळूहळू सिनेमा आणि इंटर नेटवरील वेगवेगळ्या अश्लील साईट वरील उत्तेजक दृश्य आणि कथा पाहून भारतीयांची मानसिकताही बदलत चालली आहे. पाश्चात्य संस्कृती मधील व्यभिचाराची लागण भारतीय तरुण पिढीला होऊ झालेली आहे. पाश्चात्य संस्कृतीत लैंगिकतेला कोणतेही धरबंध किंवा मर्यादा नाही फक्त इच्छापूर्ती एवढेच त्यांना ठावूक असते. आपल्याकडे मात्र अशा विकृतींना थारा नसल्याने जर कुणाला अशा विकृतींचे व्यसन असेल तर ते समाजापासून लपून ठेवावे लागते. कारण उघडपणे असे कुणी केल्याचे आढळले, तर समाज आणि कायदाही त्याला माफ करीत नाही. मात्र तरीही भारतात असे विकृत लोक आहेत ज्यांना भिन्न लिंगी संबंधांपेक्षा समलिंगी संबंधांमध्ये अधिक इंटरेस्ट असतो, पण समाज अशा लोकांकडे तुच्छतेने बघतो त्यांच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. पण तरीही असे लोक लपून छापून का होईना आपले संबंध कायम ठेवतात. त्याचबरोबर आपली हि विकृती समाजासमोर येणार नाही याची सतत काळजी घेत असतात. श्रीगोंदा तालुक्यातील दानेवाडी गावात सागर गव्हाणे आणि माऊली गव्हाणे या दोन तरुणांची मैत्री होती, पण सागर गव्हानेचे एका अल्पवयीन मुलाशी समलिंगी संबंध होते. याची माहिती माऊली गव्हानेला समजताच त्याने पळत ठेवून त्या दोघांना रंगेहात पकडले, आता मावुली आपली गावात बदनामी करणार असे सागर आणि त्याच्या त्या अल्पवयीन मित्राला वाटू लागले. त्यामुळे माऊलीचे कायमचे तोंड बंद करण्यासाठी त्या दोघांनी अत्यंत योजनाबद्ध रित्या माऊलीची हत्या केली आणि त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून विहिरीत टाकले. मात्र या अमानुष हत्याकांडाला वाचा फुटली आणि पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली.

पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडीसारख्या छोट्या गावातील ही घटना. या गावात सागर गव्हाणे आणि माऊली गव्हाणे हे विशीतील तरूण रहातात. गावामध्ये सगळ्यांनाच बऱ्यापैकी माहिती होते की सागर गव्हाणे आणि त्या अल्पवयीन मुलांची मैत्री आहे. माऊली गव्हाणे सुद्धा हे जाणून होता, पण आता त्याला त्या मैत्रीबद्दल शंका येत होती, म्हणूनच तो आज त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पहात होता आणि ही बाब सागर गव्हाणे आणि त्या मुलाच्या लक्षात आल्यावर ते दोघे त्याच्याजवळ आले. सागर गव्हाणे आणि तो मुलगा माऊली गव्हाणेवर जवळ-जवळ डाफरलेच, 'काय रे मघापासन आमी बगतोय... तू आमच्याकडं असा का बगाया लागलायस. त्यांचे ते डाफरून बोलणे माऊली गव्हाणेला आवडले नाही. 'चोर तो चोर आणि वर शिरजोर' असे मनाशी म्हणत तोही म्हणाला, 'तुम्हाला काय वाटलं रं. लई घट्ट मैत्री हाय व्हय तुमची! गावाला आणि आपल्या घरच्यांना ...पान २ वर

## पत्नीवरील संशयामुळे पती बेभान झाला रस्त्यात भाजपा कार्यकर्त्याचा खून केला

माजलगांव (बीड)/क्राईम रिपोर्टर

माजलगांव मधील भाजपाचे तालुका सरचिटणीस बाबासाहेब आगे यांची कलावती नावाच्या महिलेशी पूर्वीपासून ओळख होती. कारण पूर्वी ती आगे यांच्या शेजारी रहायची, त्यामुळे बोलाचाल असायची. पण याचाच कलावतीचा पती नारायण फपाळ याला संशय आला, त्यातच फपाळ पती पत्नीच्या वादात आगे यांनी मध्यस्थी केली होती. त्यामुळे फपाळ याचा आगेवरील संशय अधिकच बळावला आणि याच संशयातून त्याने भर दिवसा आगेची हत्या केली आणि पोलीस ठाण्यात हजर झाला.



मयत बाबासाहेब आगे



आरोपी नारायण

माजलगाव शहरातील श्री स्वामी समर्थ केंद्र जवळ एक तरुण जीवचा आकांत करीत वाचवा...! वाचवा...! म्हणून सैरावैर धावत होता. त्या तरुणाच्या पाठीमागे शरीराने उंचापुरा असलेला एक तरुण हातात कोयत्या सारखे धारदार शस्त्र घेवून पाठलाग करीत होता. काही क्षणातच हातात कोयता आसलेल्या तरुणाने वाचवा... वाचवा... म्हणणाऱ्या तरुणाला गाठले आणि त्याच्या पाठीवर वार केला. जीव वाचवण्यासाठी पळत असलेला तरुण एका दुकानाच्या ओट्यावर पडला. तो विरोध करण्याच्या आधीच कोयताधारी तरुणाने त्याच्यावर सपासपवार करण्यास सुरुवात केली. हा सगळा प्रकार त्या भागातील लोकांच्या डोळ्यादेखत घडत होता. यातील काही लोकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. तर काही लोकांनी कोयताधारी तरूणाच्या दिशेने दगडफेक देखील केली. मात्र राक्षसी अवतार धारण केलेल्या त्या कोयताधारी तरुणांनी उलट लोकांना कोयत्याचा धाक दाखवून जवळ आलो तर ठार मारीन अशी दमदाटी करण्यास सुरुवात केली. तसेच जोरजरात हा बलात्कारी आहे याला जिवंत ठेवणार नाही अशी आरोही ठोकण्यास सुरुवात केली. काही क्षणातच जीवा वाचवण्यासाठी धावणारा तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याच्या हालचाली बंद झाल्या. तो पूर्णता मेल्याचे लक्षात ...पान २ वर

## दारुड्याचा त्रास भयंकर वाढला भावानेच भावाचा मुडदा पाडला

सोलापूर/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुखी ठरलेला असतो. कोणताही कामधंदा न करता दारू पिवून सतत कुटुंबातील लोकांना त्रास देणाऱ्या अशा दारुड्याला नाईलाज झाला कि अखेर कुटुंबातील लोकच संपवतात. सोलापूर जिल्ह्याच्या सांगोला तालुक्यातील चिंचोली गावात अशीच एक घटना घडली. दारू पिवून सतत आईवडिलांना शिवीगाळ करणाऱ्या एका दारुड्याला त्याच्याच लहान भावाने ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.

दारूच्या नशेत घरात आई-वडिलांना नेहमीच त्रास देणाऱ्या थोरल्या भावाचा चाकूने भोसकून खून केल्याप्रकरणी धाकट्या भावाला पोलिसांनी अटक केली आहे. सांगोला तालुक्यातील चिंचोळी गावात ही घटना घडली. कार्तिक नामदेव यादव (वय २८) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचा धाकटा भाऊ तुषार (वय २४) यास पोलिसांनी अटक केली असून, त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर झाली आहे. याबाबत मृत कार्तिकचे वडील नामदेव रावसाहेब यादव (वय ५०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते आपली पत्नी नंदा हिच्यासह कार्तिक व तुषार यांच्या सोबत एकत्र राहतात. थोरला मुलगा कार्तिक हा काहीही कामधंदा न करता दररोज दारू पिऊन त्रास देत होता. विशेषतः आई नंदा आणि वडील नामदेव यांना वारंवार दारूच्या नशेत शिवीगाळ, मारहाण करून त्रास ...पान २ वर

## विकृत मौलाना नोकराचा खून करून पळाला पाच वर्षांनी पोलिसांना उत्तराखंडमध्ये मिळाला

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

गुन्हेगार किती जरी चलाख असला तरी कधीना कधी तो पोलिसांच्या जाळ्यात अडकतोच. कारण गुन्हा करून पळताना त्याने अप्रत्यक्षपणे काहीना काही पुरावा मागे ठेवलेला असतो आणि हाच पुरावा त्याच्यासाठी पुढे फाशीचा दोर बनतो. भिवंडीतील एका मौलानाने आपल्या दुकानातील नोकराची हत्या करून उत्तराखंडला पळाला होता. पण तब्बल ५ वर्षांनी तो पोलिसांच्या जाळ्यात अडकला आणि पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.





मयत शोएब शेख



भिवंडीतील १६ वर्षांच्या अपहृत अल्पवयीन मुलाची हत्या झाल्याची बाब तब्बल पाच वर्षांनी उघडकीस आली आहे. या प्रकरणी मालमत्ता गुन्हे कक्षाने उत्तराखंड येथून एकाला अटक केली आहे. गुलाब ऊर्फ गुलाम रब्बानी शेख असे या आरोपीचे नाव आहे. त्याचे अन्य एका लहान मुलासोबत असलेले अनैसर्गिक संबंध पीडित मुलाने पाहिले होते. तो सर्वांना सांगेल, या भीतीपोटी शेखने त्याची हत्या केल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली. ...पान २ वर

## उन्हात खेळू नकोस सांगणे गुन्हा ठरला सख्ख्या भावाने बहिणीचा गळा चिरला

नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

आजकाल समाज इतका बिघडला आहे की लहान वयातच मुलांची पावले गुन्हेगारीकडे वळतात. आई वडिलांचा मुलांना धाक नसल्याने मुले कुणाचेही ऐकत नाहीत. छोट्या छोट्या गोष्टीवरून त्यांना राग येतो आणि रागाच्या भरात त्यांच्या हातून काहीही घडते. नालासोपाराच्या संतोष भुवन येथे अशीच एक भयंकर घटना घडली आहे. आई वडील कामाला गेल्यानंतर भाऊ- बहिण दोघेच घरात होते. दुपारच्या वेळेला उन जास्त असल्याने बाहेर खेळायला जावू नकोस असे बहिणीने भावाला सांगितले. यावरून दोघांचे भांडण झाले. या भांडणात भाऊ इतका चिडला कि त्याने कटरने गळा चिरून बहिणीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला ताब्यात घेतले आहे.

खेळण्यावरून झालेल्या भांडणात १३ वर्षीय मुलाने आपल्या ७ वर्षीय लहान बहिणीची कटरने गळ्यावर वार करून हत्या केल्याचा प्रकार नालासोपारा येथे उघडकीस आला आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेने या प्रकरणी अल्पवयीन भावाला ताब्यात घेतले आहे. शवविच्छेदन अहवाल आणि मुलीच्या मानेवरील संशयास्पद जखमा यामुळे या प्रकरणाचा उलगडा झाला. मार्च महिन्यात देखील १२ वर्षीय मुलाने आपल्या ६ वर्षीय आत्येबहिणीची गळा दाबून हत्या केली होती. नालासोपारा पूर्वेच्या संतोषभुवन परिसरात असलेल्या ...पान २ वर

## बहिणीच्या जावयाने अचूक साधला डाव संपत्तीसाठी मायलेकावरच घातला घाव

अथणी/क्राईम रिपोर्टर



संपतीचा हव्यास सर्वांना असतो. अशावेळी नात्यातली माणसे अधिक धोकादायक ठरतात. त्यामुळे त्यांना सहसा जवळ करू नये. दुर्दैवाने हीच गोष्ट कोडगनूर मधल्या विठ्ठल आणि त्याची आई चंद्रव्वा यांना कळली नाही विठ्ठलने आपल्या मावशीचा जावी सुरेश्वर विश्वास टाकून त्याच्याशी मैत्री केली पण सुरेशचा डोळा चंद्रव्वा आणि तिच्या पश्चात तिचा वारस असलेल्या विठ्ठलच्या संपत्तीवर होती, त्यातच सुरेशने एकदा विठ्ठलकडे पैसे मागितले. पण ते त्याने दिले नाही. त्यामुळे चिडलेल्या सुरेशने आपल्या मित्राच्या मदतीने चंद्रव्वा आणि विठ्ठलची हत्या केली. या दुहेरी हत्याकांडातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.



अथणी तालुक्यातील कोडगनूर येथे चंद्रव्वा इचेरी आणि त्याचा मुलगा विठ्ठल इचेरी हे दोघे राहयला आहेत. ते मुळचे नंदगाव येथील परंतु त्याची शेती कोडगनुर येथे असल्याने ते मळ्यात राहयला होते. विठ्ठल याची पत्नी गेल्या काही वर्षापूर्वी मयत झालेली आहे. त्यांना एक मुलगा आणि मुलगी आहे. मुलीचे लग्न झाले असल्याने ती आपल्या सासरी असते आणि मुलगा हा लहान असल्याने त्याला त्याने अनाथ आश्रम मध्ये ठेवले आहे. त्यामुळे विठ्ठल आणि त्याची आई दोघेच मळयात राहयला आहे. त्याची शेती ही विठ्ठल याची आई चंद्रव्वाच्या नावे असल्याने आणि त्या शेतीची किंमत आज घडीला कोटीच्या घरात आहे. त्यामुळे चंद्रव्वाच्या सगळ्या प्रॉप्रटीला ...पान ६ वर

## आई-वडिलांना शिवी देणे नाही रुचले मित्राने जिवलग मित्राला दगडाने ठेचले



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

मित्र किती जरी जिवलग असला तरी त्याने आपल्या मर्यादा पाळायच्या असतात. ज्याच्याशी मैत्री आहे त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा सुद्धा आदर करायचा असतो. पण दारूच्या नशेत काही लोक इतके बक्तात कि आपण काय बोलतोय याची त्यांना शुद्ध नसते. भिवंडी येथील दत्तू नगरमध्ये दारूच्या नशेत एका इसमाने त्याच्या मित्राच्या आई-वडिलांना शिव्या दिली. त्यामुळे मित्र इतका चिडला कि त्याने दगडाने ठेचून मित्राची हत्या केली आणि मध्य प्रदेशात पळून गेला. मात्र पोलिसांनी तिथे जावून त्याच्या मुसक्या आवळल्या आणि तुरुंगात रवानगी केली.

सहकारी मित्र दारूच्या नशेत सतत आई-वडिलांवरून शिवीगाळ करत असल्याच्या रागातून सहकारी मित्राची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना शहरातील दत्तु नगर भादवड येथे ...पान ६ वर

## कर्जाची परतफेड वेळेवर नाही झाली वसुलीच्या वादातून अखेर हत्या केली



मयत बिडवलकर

कुडाळा (ओरस)/क्राईम रिपोर्टर

कर्जाच्या रकमेवरून वाद विवाद होत असतात. कारण कर्ज घेणाऱ्याने वेळेत कर्जाची परतफेड केली नाही किंवा वेळेवर व्याज दिले नाही तर त्यातून कर्ज घेणारा आणि देणाऱ्यामध्ये जे वाद होतात त्या वादातून काही लोकांचा जीवही गेला आहे. कुडाळ मधील सिद्धिविनायक बीडवलकर याने सिद्धेश शिरसाट या दारू विक्रेत्याकडून कर्ज घेतले होते, पण तो वेळेवर व्याज देत नव्हता. तसेच कर्जाची परतफेडही करीत नव्हता. यावरून त्यांच्यात वाद झाला आणि याच वादातून शिरसाटने आपल्या मित्रांच्या सहय्याने बीडवलकर याची हत्या केली. विशेष म्हणजे २ वर्षांनी या खुनाला वाचा फुटली आणि पोलिसांनी आरोपींना अटक केली.





सिंधुदुर्गजवळील चेंदवण येथील माधवी मधुकर चव्हाण हिने ९ एप्रिल २०२३ रोजी निवती पोलीस ठाणेत आपले नातेवाईक सिद्धिविनायक बिडवलकर हा मागील दोन दिवसापासून बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली होती. निवती पोलीस ठाण्याचे स.पो.नीभीमसेन गायकवाड यांनी बेपत्ता बिडवलकर याचा शोध युध्द पातळीवर चालू केला. परंतु त्याच्या तपासाला काही यश येत नव्हते. सिध्दिविनायक बिडवलकर हा कुडाळ येथील पान बाजार येथे रहात असलेल्या सिध्देश अशोक शिरसाट याच्याकडे कामाला होता. सिध्देश शिरसाट हा अवैद्य दारू विक्री करीत होता. ...पान ६ वर

पान १ वरून...

## शुल्लक वादातून भयंकर सुडाने ...

केबलच्या वायरने गळा आवळून हत्या केली व तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला. मात्र पोलिसांनी त्याचा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली. पोटच्या मुलाने जन्मदात्या आईला मारहाण करून केबलच्या साह्याने तिचा गळा आवळून खून केला व मृतदेह गावातील बौद्ध समाजमंदिराच्या स्लॅबवर नेऊन आईने आत्महत्या केल्याचा बनाव केला. ही घटना गुरुवारी सकाळी १०च्या पूर्वी कडलास (ता. सांगोला) येथे उघडकीस आली. रतन शहाजी साळुंखे (५०, रा. कडलास, ता सांगोला) असे मृत मातेचे नाव आहे. याबाबत पोलिस पाटील रघुनाथ विश्वंभर ननवरे (रा. कडलास) यांनी फिर्याद दिली आहे. याप्रकरणी संशयित तुकाराम साळुंखे यास ताब्यात घेतल्याचे पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे यांनी सांगितले. याबाबत अधिक माहिती अशी की, बुधवारी (दि. १६) रात्री आरोपीचे आईवडिलांची किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. भांडणाला वैतागून रतन साळुंखे या घर सोडून निघून आल्या होत्या. रात्री आई घरात नसल्याचे पाहून रात्रभर आईची शोधाशोध केली असता ती कडलास गावातील एका मंदिरात झोपलेल्या अवस्थेत मिळून आली. यावेळी मुलाने आईस मारहाण करून तिचा केबलच्या साहाय्याने गळा आवळून खून केला आणि मृतदेह समाजमंदिराच्या स्लॅबवर गळ्याला केबल गुंडाळलेल्या अवस्थेत आईने आत्महत्या केल्याचा बनाव केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## समलिंगी संबंधाचे गुपित फुटताच ...

फसवत असाल, पण मला तुम्ही फसवू शकत नाही. लाज कशी वाटत नाही रे तुम्हाला!' तेंव्हा ते दोघेही सटपटले, तरीही उसने अवसान आणून ते दोघे त्याला डाफरून बोलू लागले. 'काय रे कशाबद्दल बोलतोस तू?आमची लाज कशाला काढतोस...' त्यावर माऊली गव्हाणे म्हणाला, आरं अमुक-तमुक ठिकाणी तुम्ही दोघं काय करत होता हे मला काय माहित नाय व्हय... सांगू काय तुमच्या घरच्यांना... गावात समजलं तर छीऽथू होईल तुमची आणि तुमच्या घरच्यांचीसुद्धा! त्यावर सागर गव्हाणे आणि तो अल्पवयीन मुलगा एकमेकांकडे बघू लागले. अहिल्यानगर-पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडी हे एक छोटसं गाव. या गावात सागर गव्हाणे हा वीस वर्षाचा तरूण रहातो. त्याला एक बहीण आहे. कुटुंबातील तो वंशाचा दिवा असल्याने लाडाकोडात तो वाढला आहे. सध्या तो सी.टी. बोरा कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षाला शिकतो. गावातच एक अल्पवयीन मुलगा आहे. खात्या-पित्या घातील तो मुलगा असून घरी वडीलोपार्जीत शेती, वडील एक्स सर्व्हिसमन असल्याने घरातील वातावरणही मोकळे-ढाकळे आहे. या मुलाशी सागर गव्हाणेची मैत्री आहे. गेल्या एक-दीड वर्षापासून ते दोघे एकत्रच हिंडत-फिरत. वयात अंतर असले तरी दोघांमधील ही मैत्री सध्या घट्ट होत चालली आहे. त्याला कारणही तसेच आहे, कारण दोघेही तरूण आहेत. खरे तर या वयात भिन्नलिंगीबद्दल आकर्षण निर्माण होते, पण त्यांच्यामध्ये मात्र समलैंगिक आकर्षण निर्माण झाले होते ही मैत्री घट्ट होण्यामागचे होते. समलैंगिक संबंध यामध्ये तो अल्पवयीन मुलगा बायकी वाटणाऱ्या सागरला चांगलाच खेळवू लागला होता. ते एक समलैंगिक जोडपे झाले होते. वेळ मिळेल त्यावेळी तृष्णा भागवत होते. गावातील लोकांनाच काय घरातील लोकांनाही याची भनक नव्हती. दोघांनाही वाटत होते की आपला बद्दल कुणालाच समजले नाही. म्हणून ते दोघेही बिनधास्तपणे गावात फिरत होते. मांजर कितीही डोळे झाकून दुध पीत असले तरी त्याची चाहूल कुणालातरी लागलेलीच असते. तसेच काहीसे झाले. सागरचा एक समवयीन मित्र होता. त्याचे नाव माऊली गव्हाणे. त्याला या दोघांबद्दल काहीतरी कुणकुण लागलेली होती. हे दोघे कायम एकत्र कसे असतात ? त्यांना कुठेतरी बाहेर जायचे असले तर ते इतर कुणाला बरोबर का नेत नाहीत. आडवळणी व शेत शिवारात हे दोघे एकत्र काय करत असतात? याविषयी माऊलीच्या मनात शंका निर्माण होत होती. एके दिवशी त्याने पाळत ठेवून ते नेमके आडोशाला जावून काय करतात हे पाहिलेच ! ते पाहून त्याचे डोकेच फिरले! या दोघांच्या एकत्र येण्याला ही गोष्ट कारणीभूत आहे होय, छीऽऽ! असे मनातल्या मनात म्हणून तो तेथून निघून गेला होता. आपल्या समलैंगिक संबंधाबद्दल गावात कुणाला कळलं नाही, पण याला मात्र कळलं. आता तो गावात बोंबाबोंब करणार अशी भीती सागर गव्हाणे आणि त्या मुलाला वाटू लागली. तसे करण्यापूर्वीच माऊलीचे काहीतरी करायला हवे असे त्या दोघांनी एकमेकांशी चर्चा करून ठरवले. यासाठी काय-काय आणि कसं कसं करायचे याचा विचारविनीमय त्यांनी केला आणि त्यांनी एक प्लॅन आखला. यासाठी त्यांनी दाणेवाडी शिवारातील गोपाळवाडी हे ठिकाण निवडले. अल्पवयीन मुलाचे वडील एक्स सर्व्हिसमन असल्याने एकदा पर्यटनाला गेल्यावर त्यांनी एक धारदार तलवार आणली होती. त्या तलवारीनेच माऊलीला संपवायचे असे त्यांनी ठरवले. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार त्या दोघांनी धारदार तलवार, पोती, दोऱ्या अशा गोष्टी त्या निर्जन ठिकाणी अगोदरच आणून ठेवल्या होत्या. गुरूवार दि. ५ मार्च २०२५ रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास सागर गव्हाणे आणि त्या अल्पवयीन मुलाने एका निवांत ठिकाणी गांठले. त्याच्याशी चर्चा करण्याचे नाटक केले. त्यानंतर तो विषय आपण रात्री बसून मिटवून टाकू असे त्यांनी सांगितले. या जोडप्याने माऊलीला अतिशय शिताफीने सराईत असल्यासारखे सांगितले की, आम्ही तुला रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास टॉर्चचा उजेड तुझ्या घराकडे दाखवू. त्यानंतर तू तो सिग्नल समजून आमच्याकडे ठरलेल्या ठिकाणी ये, असे त्याला सांगून ते दोघे अन् माऊली आपापल्या मार्गाने निघून गेले. गुरूवार दि. ६ मार्च २०२५ रोजी माऊलीच्या घरात सर्वांनी रात्री एकत्र बसून जेवण केलं. जेवण आटोपल्यानंतर थोडा वेळ टी.व्ही. वगैरे बघून माऊलीने मोबाईलवरील मॅसेज, व्हॉटस्ॲप चेक केले. माऊलीचे त्या दोघांनी सांगितल्या वेळेप्रमाणे घड्याळाकडे लक्ष गेले. रात्रीचे साडेअकरा वाजले होते. त्याने घराबाहेर येवून गोपाळवाडीच्या दिशेने नजर टाकली तर टॉर्चचा उजेड त्याच्या घराच्या दिशेने पडला. माऊलीला काय माहित की, ते प्रकरण मिटवण्यासाठी नाही तर माऊलीलाच मिटवण्यासाठी त्यांनी कट केला आहे. माऊली आता साक्षात यमदूतालाच भेटण्यासाठी निघाला होता. गोपाळवाडीच्या त्याठिकाणी जायला माऊलीला ५-१० मिनिटे लागली. गोपाळवाडीतील ती निर्जन जागेवर असलेली खोली बाहेरगावी असणाऱ्या एका चाकरमान्याची होती. माऊली गव्हाणे तेथे पोहोचल्यानंतर ते तिघे जण जवळपासच्या झुडुपांमध्ये गेले. एका बेसावध क्षणी त्या दोघांनी माऊलीला गाठले. सागरने माऊलीच्या गळ्यात गमजा (उपरणे) टाकला. दुसऱ्याने त्याचे हात पकडले. त्यावेळी सागरने गमजाने करकचून आवळून माऊलीचा खून केला. आता त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्या अल्पवयीन मुलाने घरातून आणलेली तलवार बाहेर काढली. माऊलीच्या अवयवातून होणारा रक्तस्त्राव जिरण्यासाठी त्यांनी अगोदरच तिथे एक खड्डा खणून ठेवला होता. त्या धारदार तलवारीने त्यांनी अतिशय निर्दयीपणे माऊलीच्या शरीराचेएक-एक अवयव वेगळे केले. सोबत आणलेल्या दोन पोत्यात ते भरून त्याची तोंडे बंद केली. खड्ड्यात सांडलेल्या रक्तावर माती लोटली. ज्या तलवारीने माऊलीचे अवयव कापले ती लपवून ठेवली. आपल्याला कोणी पाहिलेले नाही. आता फक्त या दोन पोत्यांची विल्हेवाट लावायची. या हिशोबाने मध्यरात्री सागर अन् त्या अल्पवयीन मुलाने ती दोन्ही पोती उचलून घेतली. दाणेवाडी शिवारातच असलेल्या विठ्ठल मांडगे यांच्या एका आड एक अशा विहीरीत मृतदेहाबरोबर दगड भरून ती दोन्ही पोती विहीरीत टाकून दिली. माऊलीचा मोबाईलही पाण्यात टाकला. पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांनी हे सर्व केले. आपल्याला कोणी पाहिलेले नाही. जे आपण केले त्याचा पुरावाही ठेवला नाही असे म्हणून ते दोघे जण आपापल्या घरी निघून गेले. इकडे बराच वेळ झाला तरी माऊली घरी आला नाही, त्यामुळे घरचे लोक वाट पहात होते. मित्रांबरोबर गेला असेल म्हणून ते थोड्या वेळानंतर झोपून गेले, पण तो दुसऱ्या दिवशीही आला नसल्याने माऊली गव्हाणेच्या घरच्यांनी त्याचा नातेवाईक व मित्रांकडे शोध घेतला तरीही तो मिळून आला नाही. दिवस पुढे जात होते. आपण केलेला खून पचला अशा आविर्भावात सागर गव्हाणे आणि तो मुलगा निवांत होते. या घटनेला आठवडा उलटून गेला होता. त्यांना वाटले आपल्याला कोणीच पकडू शकत नाही, पण तसे होणार नव्हते. बुधवार दि. १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता बेलवंडी पोलीस ठाण्यात दाणेवाडीचे माजी सरपंच अनिल परसराम गव्हाणे यांनी फोन केला. उपनिरीक्षक मारूती कोळपे यांनी तो फोन उचलला. सरपंच अनिल गव्हाणे यांनी सांगितले की, आमच्या गावातील विठ्ठल दत्तू मांडगे यांच्या गट नं. १२२ मधील शेतातील विहीरीत एक तोंड बांधलेले पोते तरंगत आहे. आम्हाला त्याचा संशय आहे. हे ऐकून पोलीस उपनिरीक्षक मारूती कोळपे आपला चार्ज सहकाऱ्याला देवून ते पोलीस पथकासह घटनास्थळी आले. सरपंचांनी सांगितलेल्या विहीरीजवळ ते पोहोचले. त्याठिकाणी सरपंच अनिल गव्हाणे आणि विहीर मालक विठ्ठल दत्तू मांडगे आणि इतर लोकही जमले होते. पोलिसांनी विहीरीत डोकावून पोत्याचा अंदाज घेतला असता भसकन् घाणेरडा वास त्यांच्या नाकात शिरला. एकूणच हे प्रकरण काहीतरी वेगळेच आहे असे त्यांना समजून आले, पण इतक्या खोल विहीरीत जायचे कसे ? हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. यावेळी उपनिरीक्षक मारूती कोळप यांनी गावातील लोकांना मंदतीला बोलवा असे सरपंचांना सांगितले. तसे सरपंचांनी संजय हरिभाऊ थेऊरकर, राजेंद्र कोंडाभाऊ थेऊरकर, शशिकांत मोहन यांना घटनास्थळी आणले. त्या सर्वांनी एका लांबलचक गजाचा पुढचा भाग वाकवून हुक तयार केले आणि ते हुक पोत्याला लावून पोत्याचे गाठोडे ओढून वर काढले. गाठोडे वर काढल्याने त्याला दुर्गंधी सुटली होती. सगळ्यांसमोर त्या पोत्यांचे तोंड सोडले अन् सगळे आ वासून पहातच राहिले. गाठोड्यात अंदाजे २० ते २५ वर्षे वयाच्या पुरूष जातीच्या मृतदेहाचे अवशेष होते. अर्धवट कुजलेल्या त्या मृतदेहाची बारकाईने पहाणी केली असता त्यास मुंडके नव्हते. त्याचे दोन्ही हात खांद्यापासून नव्हते. धडाला उजवा पायही नव्हता. त्याच्या शरीरावर एकही कपडा नव्हता. पोलीस पथकासह सर्वांची खात्री झाली की अज्ञात - व्यक्तीला कोणीतरी धारदार हत्याराने मारून त्याचे अवयव वेगळे करून ते पोत्यात भरले आणि विहीरीत टाकले आहे. हा खुनाचा प्रकार आहे हे स्पष्ट झाले होते. एका विहीरीत हे अवयव मिळाले होते, पण उर्वरीत अवयव कुठे आहेत? यासाठी आजूबाजूच्या चार विहीरीत तपासायचा निर्णय घेतला. पहिल्या विहीरीत मयताचे धड तरंगून गोणीसह वर आले होते. त्याचा पोलिसांनी पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मारूती कोळपे यांनी शासकीय पंच बोलावून पंचनामा केला. पंचनाम्यानंतर तो मृतदेह पोस्टमार्टमसाठी अहिल्यानगर येथील सिव्हील हॉस्पिटलला पाठवण्यात आला. घटनास्थळी चार विहीरी होत्या. त्यातील एका विहीरीत हे अवयव मिळाले होते. बाकीचे गायब होते, त्यासाठी इतर विहीरी तपासणे आवश्यक होते. विहीरीच्या तळाला जावून ते बघणे गरजेचे असल्याने पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांनी कोल्हापूर येथून खास पाणबुडे बोलावून घेतले. शोध सुरू केला. अखेर तिसऱ्या विहीरीत मयत इसमाचे दोन हात, शिर व उजवा पाय एका गोणीत काही दगड घातलेल्या अवस्थेत मिळून आले. बेलवंडी पोलिसांनी या अवयवांचा पंचनामा करून ते सर्व छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रूग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले. दुसऱ्या गोणीत सापडलेल्या शिर व इतर अवशेषांचा पंचनामा करतांना पोलिसांना मयताच्या कानात एक बाळी आढळून आली. त्यावरून पोलिसांनी मयताची ओळख पटवण्यासाठी मयताच्या कानातील बाळीचा उल्लेख केला. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी, तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस ठाणे अंतर्गत कोणी बेपत्ता आहे का ? हे अवयव मिळाले होते. बाकीचे गायब होते, त्यासाठी इतर विहीरी तपासणे आवश्यक होते. विहीरीच्या तळाला जावून ते बघणे गरजेचे असल्याने पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांनी कोल्हापूर येथून खास पाणबुडे बोलावून घेतले. शोध सुरू केला. अखेर तिसऱ्या विहीरीत मयत इसमाचे दोन हात, शिर व उजवा पाय एका गोणीत काही दगड घातलेल्या अवस्थेत मिळून आले. बेलवंडी पोलिसांनी या अवयवांचा पंचनामा करून ते सर्व छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रूग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले. दुसऱ्या गोणीत सापडलेल्या शिर व इतर अवशेषांचा पंचनामा करतांना पोलिसांना मयताच्या कानात एक बाळी आढळून आली. त्यावरून पोलिसांनी मयताची ओळख पटवण्यासाठी मयताच्या कानातील बाळीचा उल्लेख केला. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी, तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस ठाणे अंतर्गत कोणी बेपत्ता आहे का ? याचीही चौकशी सुरू केली. बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक मारूती कोळपे यांनी दि. १२ मार्च २०२५ रोजी स्वतः फिर्यादी होवून गुन्हा रजि. नं. ८१/२०२५ भारतीय न्यायसंहिता १०३, २३८ (४) प्रमाणे रात्री सव्वाआठ वाजता गुन्हा नोंदवला. मृतकाची ओळख पटवण्यासाठी दाणेवाडी, तसेच शेजारच्या गावात याचीही चौकशी सुरू केली.बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक मारूती कोळपे यांनी दि. १२ मार्च २०२५ रोजी स्वतः फिर्यादी होवून गुन्हा रजि. नं. ८१/२०२५ भारतीय न्यायसंहिता १०३, २३८ (४) प्रमाणे रात्री सव्वाआठ वाजता गुन्हा नोंदवला. मृतकाची ओळख पटवण्यासाठी दाणेवाडी, तसेच शेजारच्या गावात चौकशी सुरू केली. पहिल्या विहीरीत सापडलेल्या मृतदेहाच्या अवयवावरून दाणेवाडी येथील गव्हाणे कुटुंबातील मोठ्या लोकांना तो आमचा माऊलीच असावा असे १५ ते २० टक्के वाटत होते, मात्र ज्यावेळेस दुसऱ्या विहीरीत सापडलेल्या अवयवावरून आणि कानातील बाळीवरून खात्री पटली की तो मृतदेह माऊली संतोष गव्हाणे (वय १९, रा. दाणेवाडी, पो. राजापूर, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) याचा आहे. अखेर पोलिसांचे ओळख पटवण्याचे काम यशस्वी झाले होते. आता तपास करणे सोयीस्कर होणार होते. इकडे माऊलीच्या घरच्यांनाही समजून येत नव्हते की कोणत्या कारणावरून आपल्या मुलाची इतक्या निघृणपणे हत्या झाली असावी? नेमके कारणच माहित नसल्याने पोलिसांना तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेणे भाग होते. दरम्यान या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना मिळताच त्यांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्याकडे सोपवला. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव, अंमलदार बापूसाहेब फोलाणे, शाहीद शेख, बिरप्पा करमल, अरूण गांगुर्डे, संतोष खैरे, रविंद्र घुंगासे, आकाश काळे, विशाल तनपुरे, सागर ससाने, प्रमोद जाधव, रोहित मिसाळ, अशोक लिपणे, अमोल कोतकर, मनोज लातुरकर, जालींदर माने, फुरकान शेख, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, महादेव भांड, अर्जुन बडे अशांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. त्यांनी घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले. माऊली गव्हाणे कुटुंबीयांकडून अधिकमाहिती घेतली. परिसरातील व रस्त्यावरचे फुटेज यांचे तांत्रिक विश्लेषण सुरू केले. नुकतीच बारावीची परीक्षा दिलेल्या या १९ वर्षीय मुलाचे कोणाशी वैर आहे का? त्याच्या घरातील वातावरण कसे आहे? याची पोलिसांनी माहिती घेतली. त्याच्या कुटुंबात वडील, बहीण आणि सावत्र आई आहे हे पोलिसांना समजून घेतले. घरातील वातावरण अतिशय चांगले होते. तसेच त्याचे कुणाशी अनैतिक संबंध आहेत का? याचाही शोध घेतला. पोलीस अहोरात्र प्रयत्न करत होते. त्यातून संकलित केलेल्या माहितीवरून आणि तांत्रिक विश्लेषणावरून, सी.सी.टी.व्ही. फुटेजवरून पोलीस जवळ-जवळ आरोपींपर्यंत पोहोचले होते. पोलिसांनी दाणेवाडीसह जवळपासच्या गावांत आपले खबरे पेरले होते. तांत्रिक विश्लेषण व खबरे या सगळ्यांचा बारकाईने अभ्यास करून अखेर पोलिसांनी दाणेवाडी येथील सागर दादाभाऊ गव्हाणे (वय २०) याला संशयावरून ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी - सुरू केली, पण तो दाद देत नव्हता. अखेर पोलिसांनी चौदावे - रत्न दाखवताच तो बोलता झाला. सागर गव्हाणे याने आपला गुन्हा कबुल केला. आपल्याबरोबर असलेल्या मुलाचे नावही त्याने सांगितले. त्याला अठरा वर्षे पूर्ण होण्यास अजून तीन महिने बाकी असल्याने तो विधीसंघर्षीत बालक असल्याने त्याच्या नावाची वाच्यता करता येत नाही, पण पोलिसांनी त्यालाही ताब्यात घेतले. त्याला बालसुधारगृहात पाठवले असून सागर गव्हाणे याला श्रीगोंदा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दि. २४ मार्च२०२५ पर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे. पोलीस कोठडीत सागर गव्हाणे याने गुन्ह्याची कबुली दिली असून तो का? आणि कसा केला? याची सविस्तरपणे माहिती दिली आहे. या घटनेने दाणेवाडी गाव संतप्त झाला. आरोपीला तात्काळ फाशी द्या अशी मागणी त्यांनी केली असून श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनीही माऊली गव्हाणे हत्येचा निषेध करून चालू अधिवेशनात लक्षवेधी मांडली. या भयंकर गुन्ह्याचा लवकरात लवकर छडा लावून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणीही केली. दरम्यान पोस्टमार्टम केल्यानंतर माऊलीचा मृतदेह नातेवाईकांना देण्यात आला. त्यावेळी त्यांनी संशयित सागर गव्हाणे याच्या घरासमोरच अंत्यविधी करायचा असा आग्रह धरला. पोलिसांनी मध्यस्थी करून त्यांची समजूत घातली. त्यानंतर घोडनदी तीरावर अंत्यविधी करण्यात आला. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपअधीक्षक विवेकानंद वाखारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, उपनिरीक्षक तुषार धाकराव, त्यांचे पथक, बेलवंडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष भंडारे, पोलीस उपनिरीक्षक मारूती कोळपे आदींनी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## पत्नीवरील संशयामुळे पती बेभान...

आल्यास कोयताधारी तरूण तेथून सहज चालत निघून गेला. माजलगाव शहरातील श्री स्वामी समर्थ केंद्र जवळ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास एका तरुणावर कोयत्याने हल्ला करून त्याला ठार मारल्याची वार्ता माजलगाव परिसरात वाऱ्यासारखी पसरली. घटनास्थळावरील काही दक्ष नागरिकांनी माजलगाव शहर पोलिसांना संपर्क साधून घटनेची माहिती दिली. काही वेळात माजलगाव शहर पोलिसांचे घटनास्थळी दाखल झाले. माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहूल सूर्यताल यांनी उपस्थित लोकांकडून घटनेची प्राथमिक माहिती घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरुणाचे नाव बाबासाहेब प्रभाकर आगे असे असून तो भाजपा कार्यकर्ता असल्याची माहिती समोर आली. तसेच तो काही तासापूर्वी श्री स्वामी समर्थ मंदिरा परिसरात असलेल्या भाजपा कार्यलयातील तालुका अध्यक्ष अरुण राऊत यांना भेटण्यासाठी आला होता अशी माहिती समोर आली. तसेच तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेला बाबासाहेब प्रभाकर आगे हा माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगावचा रहिवाशी असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी सदरील घटनेची प्राथमिक माहिती घेऊन रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरुणांच्या गावाकडे संपर्क साधून त्यांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती दिली. काहीच तासात मयत तरुणाचे नातेवाईक घटनास्थळी दाखल झाले. माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळाचा पंचनामा करण्यास सुरुवात केली. घटनास्थळावरून आवश्यक ती माहिती हस्तगत करत प्रेत उतरणीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्याची तजबीज केली. दरम्यान माजलगाव शहर पोलीस ठाण्यात एक तरूण हातात धारदार शस्त्र घेऊन माझे नावा नारायण शंकर फपाळ असून मी बाबासाहेब प्रभाकर आगे याचा खून केल्याचे सांगत पोलिस ठाण्यात हजर झाला. ठाणे अंलदारांनी सदरील तरूणाची अधीक चौकशी करत वरीष्ठांना खबर दिली. तसेच सदरील तरूणाला ताब्यात घेतले.मयताचा मेहुणा बबन प्रभू घाटोळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरंन १४८/२५ कलम १०३ भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कावत, माजलगाव उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यताल यांच्या हाती देण्यात आले. पोलिसांनी सर्वप्रथम या खुन प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे एक पोलीस पथक सर्वप्रथम किट्टी आडगाव या गावी दाखल झाले. त्यांनी बाबासाहेब प्रभाकर आगे यांच्या नातेवाईकांची भेट घेऊन प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. सामाजिक कार्याची आवड असलेला बाबासाहेब आगे हा सुरुवातीपासूनच गावात सर्वपरीचीत होता. सन २०१६ मध्ये झालेल्या पाणी टंचाई काळात त्यांनी गावकऱ्यांना एकत्र करत पुण्यातील एका सामाजिक संस्थेच्या सोबत गावात जलसंधारणाची कामे केली होती. तसेच गावपातळीवर होत असलेली वाद मिटवण्यात त्यांचा चांगला हातकंडा होता. एक सुसंस्कृत, मनमिळाऊ, प्रामाणिक अशी त्यांची ख्याती होती. बाबासाहेब प्रभाकर आगे हे ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम पाहत होते. ते भाजपाचे कार्यकर्ते होते. पुढे त्यांच्या कार्याची भाजपाने दखल घेत त्यांची तालुका सरचिटणीस पदी निवड केली होती. लोकसभा आणि विधानसभेमध्ये पक्षाचा विस्तारक म्हणून बाबासाहेब प्रभाकर आगे यांनी उत्तम भूमिका पार पाडली होती. बीड जिल्हा राजकारणात जातीय रंग भरलेला आसला तरी बाबासाहेब पक्षाशी एकनिष्ठ काम करत होते. पण त्यांचे कुठल्याही विरोधकांशी वाद नसल्याची देखील माहीती समोर आली. दरम्यान नारायण शंकर फपाळ याची बायको कलावती मुळ किट्टी आडगावची होती तसेच ती बाबासाहेब आगे यांच्या शेजारी राहत होती. बाबासाहेब आगे आणी कलावतीची लहानपणापासून ओळख होती अशी खात्रीलायक माहीती पोलिसांच्या हाती आली. दरम्यान ईकडे पोलिसांनी नारायण शंकर फपाळ याला विश्वासात घेवून आधिक माहीती मिळवली असता माजलगाव तालुक्यातील बेलुरा गावचा मूळ रहिवासी असलेला नारायण शंकर फपाळ याचा विवाह दहा वर्षांपूर्वी माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील (नाव बदललेले) कलावती नामक तरुणीशी झाला होता. लग्नानंतर नारायण आणि कलावती यांचा संसार सुखात चालला होता. दरम्यान त्यांना दोन अपत्य ही झाली होती. नारायण फपाळ हा आपली पत्नी आई-वडिल यांच्यासह एकत्र कुटुंब पद्धतीत राहत होता. नारायण लागेल ते काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. कलावती देखील त्याच्या कामांमध्ये हातभार लावत होती. कलावती ही चंचल आणि बोलक्या स्वभावाची असल्याने ती सर्वांशी प्रेमाने बोलत होती. नारायण फपाळ हा सुरुवातीपासूनच व्यसनी स्वभावाचा होता. अधून मधून तो दारू पिऊन आई -वडील बायकोशी सतत भांडण करत होता. आपली बायको इतरांशी प्रेमाने वागते व आपल्याशी वागत नाही असा त्याचा समज झाला होता. या कारणातून नारायण फपाळ हा नेहमीच बायकोच्या चारित्र्यावर संशय घेत होता. गावातील लोकांना सहज जरी बोलल तरी तो कलावतील संशयी नजरेतून बघत होता. यातूनच क्षुल्लक क्षुल्लक कारणावरून नवरा बायकोच भांडण होत होते. नवऱ्याच्या सततच्या जाचाला कंटाळून कलावती किट्टी आडगावला आपल्या माहेरी जात होती. कलावती आणी नारायण यांचे भांडणे पोलिस ठाण्यापर्यंत गेले होते. कधी पोलिसांनी तर कधी गावकऱ्यांनी समजूत काढून नारायण आणी कलावतीचा संसार मार्गी लावण्याचा प्रयत्न केला होता. बऱ्याच वेळेस शेजारी म्हणुन बाबासाहेब आगे यांनी कलावती आणी नारायण याच्यात मध्येस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. तेंव्हापासून नारायणच्या मनात कलावती आणी बाबासाहेब आगे याचे संबध आसल्याचा संशय निर्माण झाला होता. दरम्यान गेल्या दोना महिण्यपुर्वी चारित्र्याच्या संशयावरून नारायण आणी कलावती यांच्यात झाला. तेंव्हा कलावती माहेरी निघुन आली होती. दरम्यान बाबासाहेब आगे आणी त्यांच्या मित्रांनी मध्यस्थी करत कलावतीची बाजू घेत नारायणला समज दिला होता. यांचा नारायणला राग आला होता. बाबासाहेब आगे मुळे आपली बायको परत आपल्याकडे येत नाही असा पक्का समज नारायणला झाला होता. त्यामुळे नारायण बाबासाहेबावर दात खाऊन होता. काही दिवसापुर्वी बाबासाहेब आगे बेलूरा गावातील एका जमीनीचा वाद मिटविण्यासाठी गावात आला होता. त्यावेळेस नारायण फपाळ यांनी बाबासाहेब आगेला तुझ्यामुळे माझी बायको येत नाही. तूझे आणी तिचे संबध आहेत. ते तू तोडून टाक नाहीतर तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली होती. मात्र बाबासाहेब आगे यांनी त्याच्याकडे दुर्ल केले होते. गेंल्या एक महीन्यापासून नारायण फपाळ बाबासाहेब आगेच्या मागावर पाळत ठेवून होता. दरम्यान १५ एप्रिल २०२५ रोजी बाबासाहेब आगे माजलागात येणार आसल्याचे कळाले. त्याचा कायमचा काटा काढण्याचा बेत करत नारायण यांने बाबसाहेब आगे याच्यावर पाळत ठेवली. दुपारच्या सुमारास बाबासाहेब आगे श्री स्वामी समर्थ मंदीर परीसरातील भाजपा कार्यलयात आला. काम संपवून तो काही वेळांनी कार्यलयाच्या बाहेर आला. तेंव्हा वाट बघत बसलेल्या नारायण फपाळ यांने त्याचा पाठलाग करत शेर्टात लपावून ठेवलेला कोयता काढून बाबासाहेब आगेवर सपासप वार केली. बाबासाहेब आगेच्या शरीरातून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या व त्याचा जागीच मृत्यु झाला. असे सांगून आपल्या गुन्ह्याची कबूली दिली. पोलिसांनी या खून प्रकरणाच्या तपासात आरोपीने वापरलेले हत्यार रक्ताने माखलेले कपडे जप्त केले असून बाबासाहेब आगेचा खूनाला आणखी काही वेगळ वाद आहे का हे पहात आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सतिष दिंडे करीत आहेत.

## दारुड्याचा त्रास भयंकर वाढला...

देत असल्याने त्यास सारेजण वैतागले होते. धाकटा भाऊ तुषार हा त्याच्यावर चिडून होता. याच कारणावरून चिंचोळी गावच्या हद्दीत शिवरत्न पेट्रोल पंपासमोर मनोहर नामदेव घाडगे यांच्या शेतातील रस्त्याच्या बाजूला विहिरीच्या भरावाजवळ सकाळी पावणेअकराच्या सुमारास कार्तिक आणि तुषार हे दोघे भाऊ एकमेकांना भिडले. त्या वेळी तुषार याने कार्तिक यास, तू वारंवार दारू पिऊन आई-वडिलांना का त्रास देतोस, असा विचारत त्याच्यावर चाकूने हल्ला केला. छातीखाली डाव्या बाजूला बरगडीवर चाकूने भोसकल्याने त्याचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला.

## विकृत मौलाना नोकराचा खून करून ...

'पोक्सो'च्या अंतर्गत अटकेत असलेल्या शेखला न्यायालयाने १९ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. साडेचार वर्षांपूर्वी म्हणजेच २० नोव्हेंबर २०२० रोजी अचानक बेपत्ता झालेल्या १७ वर्षीय शोएब शेखच्या बेपत्ता होण्यामागचं रहस्य अखेर उलगडलं आहे. ठाणे क्राईम सेलने या प्रकरणात एक धक्कादायक कारवाई करत मौलवी गुलाम रब्बानी शेख याला अटक केली आहे. या मौलवीने शोएब शेखची निर्घृणपणे हत्या केली होती आणि त्याचे शरीर छोटे-छोटे तुकडे करून काही कचऱ्यात फेकले होते. तर काही अवशेष स्वतःच्या किराणा दुकानात गाडून टाकले होते. ही घटना अक्षरशः एखाद्या थरारक चित्रपटात घडावी अशी असून अनेकांना अजय देवगणच्या 'दृश्यम' चित्रपटाची आठवण करून देणारी आहे. शोएब शेख हा भिवंडीच्या नवी बस्ती, नेहरू नगर भागात आपल्या कुटुंबासोबत राहत होता. घरात एकुलता एक मुलगा असल्यामुळे संपूर्ण कुटुंबाचे प्रेम त्याच्यावर होते. २० नोव्हेंबर २०२० रोजी तो अचानक बेपत्ता झाला. त्याच्या अपहरणाची तक्रार भिवंडी शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. मात्र, सुरुवातीला कोणताही ठोस पुरावा न मिळाल्याने पोलिसांनाही शोधकार्य करण्यात अपयश येत होते. गुलाम रब्बानी शेख हा नेहरू नगरमधील एका मशिदीत अजान देण्याचा काम करत होता, त्याचबरोबर तो बाबागिरी करायचा आणि किराणा दुकानही चालवत होता. त्याच्या दुकानात एका अल्पवयीन मुलाला देखील कामावर ठेवले होते. पण याच दुकानात तो अल्पवयीन मुलांसोबत दुष्कृत्य करत असल्याची माहिती पुढे आली. हे कुकर्म शोएबने पाहिले होते आणि तो हा प्रकार सर्वांना सांगेल या भीतीने मौलवीने त्याला गप्प राहण्यासाठी सांगितले होते. त्याबद्दल मौलवी शोएबला पैसे देत होता. परंतु काही दिवसांनी शोएब शेखची मागणी वाढत त्याने दुकानातून सामान घेऊन पैसे देणंही बंद केलं होतं आणि नंतर मौलवीकडून पैसे उकळायला सुरुवात केली होती. याला कंटाळून मौलवीने एक दिवस शोएबला दुकानात बोलावून त्याचा गळा दाबून हत्या केली आणि त्याचा मृतदेह दुकानातच गाडून टाकले. आठ महिन्यांनंतर जेव्हा गाडलेल्या शवाचा काही भाग जमिनीवरून बाहेर यायला लागला, तेव्हा मौलवीने त्याचे छोटे छोटे तुकडे करून, दुकानात काम करणाऱ्या दुसऱ्या अल्पवयीन मुलाच्या हातून ते कचऱ्यात टाकून दिले. त्यानंतर उरलेले शव पुन्हा गाडून वर टाईल्स बसवल्या. या संपूर्ण प्रकरणात मौलवीन शोएबच्या कुटुंबाला खोटी आश्वासने देत राहिला. कधी अजमेर शरीफच्या नियाजचा सल्ला, कधी बकऱ्याची बळी या सगळ्या उपायांमधून तो कुटुंबाला फसवत राहिला. दोन वर्षे हा प्रकार चालू होता. २०२३ मध्ये अचानक शोएबच्या आईला कोणीतरी सांगितलं की तिच्या मुलाचा खून अजान देणाऱ्या मौलवीनेच केला आहे. त्यानंतर कुटुंबाने पोलिसांकडे धाव घेतली आणि या प्रकरणाचा उलगडा झाला. चौकशी सुरु असताना मौलवी गुलाम रब्बानी शेख हा गर्दीचा फायदा घेत पोलीस ठाण्यातून फरार झाला होता. या मौलवीने ज्या अल्पवयीन मुलांवर अत्याचार केले होते त्या अल्पवयीन मुलाने देखील २०२३ मध्ये या मौलवी विरोधात लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. फरार झालेल्या मौलवीने दिल्लीमार्गे उत्तराखंडच्या रुडकी जिल्ह्यात गेला आणि तिथे ओळख बदलून एका मशिदीत पुन्हा मौलवी म्हणून काम करू लागला. उत्तराखंडमध्ये एका वादात त्याने मी कित्येकांना कापून गाडलं आहे असं धमकीवजा विधान केलं, आणि त्याच्या माहितीचा शोध घेतल्यावर समोर आलं की तो भिवंडीचा वॉन्टेड आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर ठाणे क्राईम प्रॉपर्टी सेलच्या टीमने मोबाईल ट्रॅकिंगच्या आधारे उत्तराखंडमध्ये पोहोचून मौलवी गुलाम रब्बानी याला अटक केली. आरोपीने चौकशीत आपला गुन्हा कबूल केला असून त्याच्या दुकानात शव गाडल्याचेही मान्य केले. फॉरेन्सिक टीमच्या मदतीने त्या दुकानात खोदकाम केल्यानंतर शोएबच्या मृतदेहाचे अवशेष सापडले. सध्या ठाणे क्राईम प्रॉपर्टी सेल या खून आणि अपहरण प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. शोएबच्या कुटुंबाने हत्याऱ्याला फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे. शोएबच्या आईने रडत सांगितले की, माझा मुलगा खूपच निरागस होता. त्याचा इतक्या क्रूरपणे खून करणारा आमच्याच शेजारी राहात होता हे आम्हाला कधीच कळलं नाही. आज तो आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे, त्याला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

## उन्हात खेळू नकोस सांगणे गुन्हा...

पांडुरंग चाळीत मिथुन शर्मा हे पत्नी आणि दोन लहान मुलासंह राहतात. त्यांचा मोठा मुलगा १३ वर्षाचा तर मुलगी अंजली ही ७ वर्षाची आहे. शर्मा दांपत्य दिवसभर कामाला जातात. त्यांची दोन्ही मुले घरात एकटी असतात. गुरूवारी दुपारी नेहमीप्रमाणे शर्मा पती-पत्नी कामाला गेले होते. त्यांचा मोठा मुलगा खेळण्यासाठी बाहेर गेला होता. काही वेळाने तो घरात आला आणि लहान बहिणी स्टूलवरून खाली पडल्याचे त्याने शेजाऱ्यांना सांगितले. खाली धागा कापण्याचा कटर होता. स्टूलवरून बहिण या कटरवर पडली आणि जखमी होऊन मरण पावली असे त्याने सांगितले होते. त्याच्या वडिलांनीही तशीच फिर्याद दिली होती. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुरूवारी रात्री अपमृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र तिच्या गळ्याला असलेल्या जखमा या संशयास्पद होता. पेल्हार पोलिसांबरोबर मध्यमवर्ती गुन्हे शाखा या प्रकरणाचा समांतर तपास करत होती. शनिवारी शवविच्छेदनाला अहवाल आला. त्यावेळी अंजलीचा मृत्यू हा गळ्यावर वार करून झाल्याचे स्पष्ट आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश कुराडे यांच्या पथकाने मुलाला ताब्यात घेऊन चौकशी केली आणि त्याने हत्येची कबुली दिली. विधीसंघर्षित मुलगा हा उनाड मुलगा आहे. तो १३ वर्षाचा असला तरी नापास होत असल्याने तिसरीत आहे, असे त्यांनी सांगितले.याबाबत माहिती देताना पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी सांगितले की, या मुलांचे आई वडील कामावर जातात. मुले घरात एकटी असतात. गुरूवारी अंजलीने मोठ्या भावाला उन्हात खेळायला जाऊ नको म्हणून सांगितले होते. त्यातून त्यांच्यात भाडणं झाली होती. त्यामुळे भावाने तिची हत्या केली.

21 TO 27 APRIL 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 4/19/2025 8:37 PM Page 1



# उत्तम आरोग्यासाठी आहारात केळीचे प्रमाण वाढवा -डॉ.के.बी.पाटील

## रावेरला जागतिक केळी दिन उत्साहात साजरा




**जळगाव/प्रतिनिधी**

जागतिक केळी उत्पादनाच्या ३० टक्के केळी आपल्या भारतात उत्पादन होते. मात्र तिचे सेवन भारतीयांमध्ये पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. सर्वांगिण दृष्टीने विचार केला असता केळी हे पौष्टीक फळ आहे त्याचे दैनंदिन जीवनशैलीच्या आहारात समावेश केल्यास उत्तम आरोग्य राहिल त्यासाठी दररोज 'दोन केळी खा आणि निरोगी रहा' हा आरोग्याचा मंत्र समजून घेतला पाहिजे, असे आवाहन डॉ. के. बी. पाटील यांनी केले. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. व जैन फार्मफ्रेश फूड्स लि. आणि अखिल भारतीय केळी उत्पादक महासंघ यांच्यातर्फे रावेर येथे एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी म्हणजे आज दि.१६ एप्रिल ला सकाळ ९ वाजता जागतिक केळी दिन साजरा करण्यात आला. रावेर पिपल्स बँकेजवळ, रावेर येथे येथे झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. के. बी. पाटील बोलत होते. याप्रसंगी जलतज्ज्ञ डॉ. सुधीर भोंगळे, माजी आमदार अरूण पाटील, केळी महासंघाचे भागवत पाटील, माऊली हॉस्पिटलचे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष हरिष गनवाणी यांच्या हस्ते केळीचे खोड व घड याचे पूजन करण्यात आले. यावेळी रामदास पाटील-निंबोल, विशाल अग्रवाल, प्रशांत महाजन, सदानंदन महाजन, प्रफूल्ल महाजन, उज्ज्वल अग्रवाल, हरी भिका पाटील, पांडुरंग पाटील, अतुल मधुकर पाटील, यश पाटील, अमोल पाटील-बलवाडी, शैलेंद्र पाटील-शिंगाडा, निलेश पाटील-अजंदा, मंदार मनोहर पाटील यांच्यासह जैन इरिगेशनतर्फे मान्यवरांचे रूमाल टोपी देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर केळी व केळीच्या ज्यूस चे वाटप केले गेले. यावेळी केळी दिनानिमित्त विशेष सजावटीसह तयार करण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर शेतकऱ्यांसह नागरिकांनी सेल्फी काढले.

जागतिक केळी दिन सर्वप्रथम युरोपीयन व अमेरिकियन देशांमध्ये साजरा केला जातो. केळी फळातील पोषणमूल्यांबाबत जागरूकता वाढून त्याचे सेवन वाढावे यासाठी केळी दिवस साजरा करण्यामागील भूमिका तसेच जागतिकस्तरावर केळीला अन्नघटकांपैकी महत्त्वाचे मानले जाते. प्रवासामध्ये सहज उपलब्ध होणारे आणि खाता येणारे सुरक्षित असे फळ असल्याचे डॉ. के. बी. पाटील यांनी सांगितले. जैन इरिगेशन गेल्या चाळीस वर्षापासून केळीच्या विकासासाठी काम करत होते. फ्रुटकेअर मॅनेजमेंट या सर्व गोष्टींमुळे केळीच्या पिकांमध्ये आज क्रांती झाली. अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिकदृष्ट्या समृद्धी आली. मात्र ज्या पद्धतीने अमेरिकन, युरोपीयन किंवा आखाती देशांमध्ये भारतापेक्षाही जास्त केळीची मागणी आहे. टांझानिया, युगांडासह अन्य देशांमध्ये वर्षाला एक माणूस ४०० किलो केळी खातो. साधारणपणे संपूर्ण आफ्रिकन देशांचा विचार केला तर सरासरी केळी खाण्याचे जे प्रमाण आहे ते अर्धा किलो ते एक किलो आहे. त्यांच्या आहारामध्ये केळी ला विशेष असे महत्त्व आहे. मात्र भारत देशाचा विचार केला तर आपण फक्त वर्षाला १३ किलो केळी खातो. जपान मध्ये साधारणत: वर्षाला १६ किलो केळीचे सेवन केले जाते. युरोपमध्ये साधारणपणे २९ किलो, युएसमध्ये वर्षाला २३ किलो केळी एक मनुष्य सेवन करतो. भारत हा जगातील केळी उत्पादनातील सगळ्यात पहिल्या क्रमांचा देश आहे. जगाच्या उत्पादनाच्या ३० टक्के केळी आपण उत्पादित करतो परंतू केळी दिनाचे जे औचित्य आहे त्यातून केळीबाबतची जागरूकता वाढावी. केळी खाण्याचे प्रमाण वाढावे कारण केळी हे न्युट्रीशनचा प्रचंड मोठा स्त्रोत आहे. यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फर, पोटॉशिअम, विटॉमिन बी-६ यासह अन्य अन्नघटक आहेत. दररोज एक केळीचे सेवन केले तर विटॉमिन बी-६ ची पुर्तता शरिरात होते. केळी व केळीपासून तयार होणारे मिल्क शेक चे सेवन केले पाहिजे. ईश्वराने नैसर्गिक पॅकेजिंग केलेले केळी हे फळ आहे. त्याला प्रवासासह कुठेही सेवन करता येते. ती नैसर्गिक रित्या आरोग्याला सुखकर आहेच निसर्गाचं सुद्धा पालन पोषण करणारं हे फळ आहे. त्यामुळे त्याचे आरोग्याच्या दृष्टीने आहारात रोज सेवन करा असे आवाहन डॉ. के. बी. पाटील यांनी केले. माजी आमदार अरूण पाटील यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. जैन इरिगेशनतर्फे जागतिक केळी दिन साजरा करण्याचा उपक्रम म्हणजे नवचैतन्य निर्माण करणारा आहे. जास्त लागवडीपेक्षा निर्यातक्षम गुणवत्ता पूर्ण उत्पादनावर शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे असे आवाहनही त्यांनी केले. यशस्वीतेसाठी जैन इरिगेशनचे अॅग्रोनॉमिस्ट राहूल भारंबे, मोहन चौधरी, चेतन गुळवे, तुषार पाटील, शुभम पाटील, भास्कर काळे, सागर मोरे, यतिश चौधरी, तुषार हरिमकर यांच्यासह जैन इरिगेशन व जैन फार्मफ्रेश फूड्स चे सहकारी यांनी सहकार्य केले.

# महापालिका हद्दीतील राष्ट्रीय महामार्गवरील नाल्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार?



**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार महापालिका हद्दीतील मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्र. ४८ वरील सखल भागांमध्ये पावसाळ्यात पाणी साचून रहदारीस अडथळा निर्माण होण्याच्या पार्श्वभूमीवर, आज १६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वा. वर्सोवा खाडी (घोडबंदर ब्रिज) येथून ते विरार फाटा पर्यंत पालिकेचे अति. आयुक्त संजय हेरवाडे यांच्या उपस्थितीत पाहणी दौरा संपन्न झाला. या दौऱ्यात वसईचे प्रांत अधिकारी शेखर घाडगे, एनएच. ४८ महामार्गाचे प्रकल्प अधिकारी सुहास चिटणीस, महापालिकेचे प्रभारी शहर अभियंता प्रदीप पाचंगे, कार्य. अभियंता प्रकाश साटम व संजय कुलकर्णी, उपायुक्त समीर भुमकर, दीपक झिंझाड, दिपक सावंत, सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर, निलेश म्हात्रे, विजय शिंदे, वीज वितरण महामंडळाकडून कार्यकारी अभियंता गिरीश भगत व अनंत, तसेच पोलीस प्रशासन व वाहतूक शाखेतील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते. पाहणी दरम्यान सखल भागांतील स्थिती व नाळ्यांची पाहणी करून पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या सुधारणा व उपाययोजना करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सदर दौऱ्याचा उद्देश संभाव्य ठिकाणी पाणी साचून राहू नये, यासाठी योग्य ती पूर्व तयारी करणे हा असून प्रशासनातील सबंधित सर्व विभाग त्यानुसार पुढील कार्यवाही तात्काळ सुरू करणार आहेत.

# भिवंडीतील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी कृती समितीची आढावा बैठक संपन्न

**भिवंडी/प्रतिनिधी**




शहरातील वाहतुक कोंडीची सोडवणूक करण्यासाठी स्थापन झालेल्या कृती समितीची बैठक नुकताच पालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. या बैठकीस अतिरीक्त आयुक्त देविदास पवार,विठ्ठल डाके, उपायुक्त (अतिक्रमण) विक्रम दराडे, सहाय्यक सहायक पोलीस आयुक्त (पुर्व) दीपक देशमुख, वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त शरद ओहोळ, शहर अभियंता जमील पटेल, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर खोत, परिवहन विभागाचे रवी साठे, प्रभागांचे सहाय्यक आयुक्त, पाणीपुरवठा, बांधकाम, विद्युत या विभागाचे अभियंते, संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते. या बैठकीमध्ये प्रामुख्याने शहरातील अनधिकृत, विनापरवाना रिक्षांवर परिवहन विभागामार्फत कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी सबंधितांना दिले. तसेच शहरातील मुदत बाह्य वाहने, विनापरवाना वाहने, फिटनेस प्रमाणपत्र नसलेली वाहनांची विशेष शोधमोहीम पुढील दोन महिने सुरू ठेवण्याबाबत पोलीस विभागाने विनंती केली, जेणेकरुन शहरातील वाहतुकीचा भार कमी होऊ शकेल. शहरातील अनधिकृत रिक्षा स्टँडवरदेखील कारवाईचे निर्देश आयुक्तांनी दिले. याकरिता परिवहन विभाग, पोलीस विभाग आणि महानगरपालिका यांनी एकत्रितपणे कारवाई करावी. तसेच, शहरातील रस्त्यांवरील, उड्डाणपुलाखालील बेवारस वाहने ज्या वाहन मालकांची आहेत त्यांनी तात्काळ तेथून घेऊन जावीत अन्यथा त्यांच्यावर बेवारस वाहन म्हणून स्टिकर चिकटवण्यात येऊन, मुदतीनंतर जप्तीची कारवाई परिवहन विभागामार्फत करण्याचे निर्देश देत या बेवारस वाहनांची तातडीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी परिवहन विभागाची राहील असे आयुक्तांनी नमुद केले. महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बांधलेला वाहनतळ विनावापर पडुन आहे, तो नागरीकांना वाहने पार्कींगसाठी मोफत उपलबध करुन देण्याबाबत मालमत्ता विभागाने तपासुन तातडीने अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्तांनी मालमत्ता विभाग प्रमुखांना दिल्या.

# सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते हांगेवाडी तलावातील गाळ उपसा मोहिमेचा शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी**



गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत अहमदपूर तालुक्यातील हांगेवाडी येथील साठवण तलावातील गाळ उपसा अभियानाचा सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचा शुभारंभ करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या जल व्यवस्थापन कृती पंधरवडा अंतर्गत जलपूजनाने या उपक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता श्रीमती रूपाली ठोंबरे होत्या. उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगारकर, लातूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र काळे, मयूर महाजन, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रदीप काळे, अमरसिंह पाटील, गटविकास अधिकारी संतोष माने, नाम फाउंडेशन संस्थेचे विलास चामे यांच्यासहनागरिक यावेळी उपस्थित होते. पाण्याचे महत्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि जलसंपत्तीचे जतन करणे, हा जल व्यवस्थापन कृती पंधरवडा आयोजनाचा उद्देश आहे. जलसंपदा विभागाच्या पुढाकाराने या कालावधीत विविध उपक्रम राबवले जात असून, शेतकऱ्यांना मार्गदर्शन व संवादाद्वारे पाण्याचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. या कृती पंधरवड्यात पाटबंधारे विकास महामंडळाच्या पुढाकाराने कालव्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड, अनधिकृत पाणी उपशावर नियंत्रण, अतिक्रमण हटवणे आणि मालमत्तेची अत्याधुनिक यंत्रणेद्वारे मोजणी असे उपक्रम हाती घेण्यात येणार असून यामुळे जलसंधारणास मदत होईल, असा विश्वास सहकारमंत्री श्री. पाटील आणि यावेळी व्यक्त केला.

# आमदार अमित देशमुख यांच्याकडून दत्तात्रय बनसोडे कुटुंबीयांचे सांत्वन



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दिनांक १८ एप्रिल रोजी सायंकाळी लातूर तालुक्यातील गंगापूर येथे जाऊन दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. यावेळी सुमित दत्तात्रय बनसोडे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे, चंद्रशेखर दंडीमे, डॉक्टर सतीश कानडे, तानाजी फुटाणे, भास्कर पाटील, बालाजी भिसे आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, बनसोडे कुटुंबीय आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

# एमडी ड्रग्ज विक्रेता आरोपीसोबत तब्बल ३५२ वेळा मोबाईलच्या माध्यमातून संपर्कात असणारे पोलीस उपनिरीक्षक दत्ता पोटे चर्चेत

**जळगाव/प्रतिनिधी**





दुबईला पळून गेलेल्या एमडी ड्रग्ज विक्रेता आरोपीसोबत तब्बल ३५२ वेळा मोबाईलच्या माध्यमातून संपर्कात असणारे पोलिस उप निरीक्षक दत्ता पोटे सध्या चर्चेत आले आहेत. तथापी त्यात काहीही आक्षेपार्ह नसल्याचा खुलासा पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी केला आहे. मात्र तरीदेखील या वृत्तामुळे जनमानसात पोलिसांच्या प्रतिमेबद्दल चर्चा मात्र सुरु झाली आहे. अरबाज नावाचा एमडी ड्रग्ज विक्रेता फरार असून तो दुबईला पळून गेला असल्याचे म्हटले जात आहे. चोरीचे दागिने हस्तगत केल्यानंतर ते मुळ मालकाला परत देण्याचे फोटो सेशन वजा कार्यक्रम करुन पोलिस दलाची कमी अधिक प्रमाणात बिघडलेली प्रतिमा दुरुस्त करण्याचा प्रयत्न तत्कालीन पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे यांच्या कार्यकाळात झाला होता. पोलिस दलाची प्रतिमा चांगली रहावी यासाठी वरिष्ठ पातळीवर आटोकाट प्रयत्न सुरु असतांना काही कर्मचारी ते काम पंक्चर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नुकत्याच समोर आलेल्या दुसऱ्या घटनेतून दिसून येते. स्थानिक गुन्हे शाखेतील गजानन देशमुख व संदीपाल जाधव या दोघा कर्मचाऱ्यांनी पेट्रोल आणि गुटखा विक्री करणाऱ्या दुकानदाराकडून हप्ता घेतल्याचा व्हिडीओ थेट पोलिस अधीक्षकांना प्राप्त झाला. त्यानंतर दोघांची बदली करण्यात आली. गजानन देशमुख या कर्मचाऱ्याची अप डाऊन साठी सोयीची असलेल्या रेल्वे रुटवरील पाचोरा येथे तर गायक संघपाल तायडे या कर्मचाऱ्याची जामनेर तालुक्याच्या सिमेवरील फत्तेपूर या निर्जन स्थळी बदली करण्यात आली आहे. खासगी नोकरीत अशा स्वरुपाचा गैरप्रकार समोर आला असता तर मालकाने कर्मचाऱ्याला कामावरुन काढूनच टाकले असते, मात्र मायबाप सरकार केवळ बदली करते असे भोळीभाबडी आम जनता म्हणते. फरार ड्रग्ज विक्रेता अरबाज आणि पीएसआय दत्ता पोटे यांच्यातील ३५२ वेळा झालेल्या मोबाईल संभाषणात आक्षेपार्ह काहीही नसल्याचे पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी म्हटले आहे. तथापी त्यांची स्थानिक गुन्हे शाखेतून दहा पावलावरील कंट्रोल रुममधे गेल्या एक महिन्यापासून बदली झाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेत काय गैर प्रकार सुरु असतात, दिव्याखाली कुठे अंधार आहे? याची पडताळणी या शाखेच्या पोलिस निरीक्षकांनी करावी अशी आम जनतेची मागणी आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**शहापूर/प्रतिनिधी**

शहापूर येथील आदिवासी पाड्यावरील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वालशेत शाळेमध्ये शिक्षक असून शाळेत घेऊन जातो, गणवेश, आधारकार्ड देतो अशी बतावणी करत अनोळखी व्यक्तीने तिला एका निर्जनस्थळी नेले होते. तिथे तिच्यावर अत्याचार केले. पिडीत मुलीने एका दुकानातून आईला दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. त्यानंतर हा प्रकार समोर आला. याप्रकरणी शहापुर पोलीस ठाण्यात अनोळखी नराधमा विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे. शहापूर तालुक्यातील वालशेत ग्रामपंचायत हद्दीतील एका पाड्यावर रस्त्यालगत असणाऱ्या घराजवळ एक अनोळखी दुचाकीस्वार आला. मी वालशेत शाळेत शिक्षक आहे, तुमच्या मुलीला शाळेत घेऊन जातो, गणवेश देतो, आधारकार्ड देतो तुम्हाला दोन हजार रुपये मिळतील अशी बतावणी पिडीत मुलीच्या आईला त्या व्यक्तीने केली.मुलीच्या आईने विश्वास ठेवून मुलीला घेऊन जा व घरी आणून सोडा असे सांगितले. त्यानंतर दुचाकीस्वाराने १३ वर्षीय मुलीला पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कांदळी येथे घेऊन गेला. एका निर्जनस्थळी घेऊन गेल्यावर तिच्यावर अत्याचार करून पोबारा केला. दरम्यान, मुलगी आली नाही म्हणून तिची शोधाशोध सुरू झाली होती. पीडित मुलीने एक दुकान गाठले तेथून फोनद्वारे संपर्क झाल्यानंतर मुलीच्या आईने शहापूर पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी अत्याचार करणाऱ्या अनोळखी व्यक्ती विरोधात शहापूर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे यांनी सांगितले.

# प्रेमकांत झा हत्याकांडातील सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट कोर्टाने फेटाळला

**विरार/प्रतिनिधी**



सीबीआयने २०१२ मध्ये विरार मधील आरटीआय कार्यकर्त्याच्या हत्येप्रकरणी दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट न्यायालयाने फेटाळून लावला आहे. या खटल्यातील दोन साक्षीदारांचा शोध घेणे अत्यावश्यक असल्याचे निरीक्षण या प्रकरणी न्यायालयाने नोंदवले आहे. दोन साक्षीदारांचे जबाब नोंदवले नसताना, तपास पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही असेही न्यायालयाने नमूद केले आहे. न्यायालयाने २५ मार्च रोजी दिलेल्या आदेशात २४ फेब्रुवारी २०१२ रोजी आरटीआय कार्यकर्ते प्रेमकांत झा यांच्या डोक्यात गोळी झाडून हत्या करण्यात आली होती, ते विरार पूर्वेला फुलपाडा येथे त्यांच्या घरी परतत होते. या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केल्यानंतर विरार पोलिसांना सदर हत्या प्रकरणी कोणतीही प्रगती करता आली नाही. त्यामुळे सदर प्रकरण सीआयडीकडे वर्ग केले. सीआयडीलाही काही विशेष हाती लागले नाही. ऑगस्ट २०१४ मध्ये हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आले. सन २०१८ मध्ये या हत्येची माहिती देण्याऱ्यास ५ लाखांचे रोख बक्षीस देखील जाहीर केले. अनेक एजन्सींनी या प्रकरणावर काम केले आहे परंतु, आजतायगत आरोपी पकडण्यास यश आले नाही. न्यायालयाच्या निर्देशानंतर सीबीआय आता साक्षीदारांचा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहे. न्यायालयाने नमूद केले की साक्षीदारांची तपासणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रकरणाचा क्लोजर रिपोर्ट शक्य नसल्याचे म्हटले आहे. वसईत आरटीआय कार्यकर्त्याच्या सदर हत्येमुळे मोठी खळबळ माजली होती. आरोपी बाबूराव रामन्ना आणि उमेश संखे या दोन इसमांना या प्रकरणात अटक करण्यात आली होती परंतु ,त्यांच्या विरोधात पुरावे मिळू शकले नाहीत तसेच त्यांना सुपारी देणाऱ्या मुख्य आरोपीला अटक करण्यात एजन्सीला अजूनही यश आलेले नाही.

# जूचंद्र येथील चंडिका देवीच्या यात्रेत रांगोळी प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद




**वसई/प्रतिनिधी**

जूचंद्र येथील ग्रामदैवत असलेल्या चंडिका देवीच्या यात्रेला आज पासून सुरुवात झाली. या यात्रेत जूचंद्र गावातील तरुणांनी काढलेल्या रांगोळ्यांचे दरवर्षी प्रदर्शन भरविण्यात येते. यावर्षी हि हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्याला रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. वसई या कलाकारांची रांगोळी परदेशातही पोहोचली आहे. देवीच्या यात्रेत वेवेगळ्या विषयावर काढलेल्या रांगोळ्या रसिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत, यामध्ये महाकुंभ मेळा, छत्रपती शिवाजी महाराज, दुष्काळाची दाहकता, ज्योतिबा, मुंबईचा हिटमॅन रोहित शर्मा छावा मधील संभाजी अश्या अनेक रांगोळ्या साकारण्यात आल्या आहेत. या रांगोळ्या शैलेश केदारनाथ पाटील, पंकज पाटील, प्रसाद पाटील, प्रविण भोईर, केतन पाटील, संजय पाटील, भारत प्रधान, मिनार पाटील, संजित पाटील, करण वटार, गणेश सालियन, प्रणित भोईर, स्नेहा मालवी, संचिता म्हात्रे, अक्षदा पाटील, जय म्हात्रे, नितेश भोईर, साई पाटील, बालाजी कोतावडे यांनी साकारल्याचे आहेत.

21 TO 27 APRIL 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 4/19/2025 8:38 PM Page 1



# हिंदीवर भाषेवर साधला नेम... हिंदुत्वाचा डबल गेम!

भाषा हे प्रामुख्याने संवादाचे माध्यम आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भलेही देशात भाषावार प्रांतरचना झालेली असली तरी या देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या प्रांताच्या भाषेचा स्वाभिमान बाळगताना देशातील इतर भाषांचा सुधा सन्मान केला. त्याचबरोबर राष्ट्रभाषेचा सुद्धा आदर केला. व्यापार उद्योग आणि प्रशासकीय सेवांमध्ये इंग्रजी भाषेचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. तेंव्हा इंग्रजी भाषाही आत्मसात केली. इंग्रजी येत नाही म्हणून इंग्रजीचा द्वेष केला नाही. किंवा व्यवहारातून इंग्रजी भाषा काढून टाकण्याची मागणी केली नाही. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे. हिंदी प्रामुख्याने उत्तर भारतीय पट्ट्यात बोलली जाते. पण त्याच बरोबर मुंबई सारख्या औद्योगिक शहरात जिथे देशाच्या वेगवेगळ्या भागातून आलेले लोक राहतात त्यांच्यात हिंदी हेच संवादाचे माध्यम आहे. त्यामुळेच कदाचित सरकारने शिक्षणात पहिलीपासून हिंदी अनिवार्य केली असावी. यात सरकारचे काही राजकारण असेल असे वाटत नाही. पण दक्षिणात्य राज्यांमधील लोकांना आणि खास करून तिथल्या लोकांना हिंदीचे वावडे आहे. यामुळे तामिळनाडूत तामिळ, कर्नाटकात कन्नड, केरळात मल्याळम आणि आंध्र, तेलंगणात तेलगु या स्थानिक भाषांचं बोलल्या जातात. पण अशावेळी तिथे एखादा उत्तर भारतीय किंवा मराठी अथवा पंजाबी माणूस गेला तर त्याची भाषेमुळे अडचण होते. कारण स्थानिक लोक त्याच्याकडे स्थानिक भाषेचा आग्रह धरतात. पण जर त्याला स्थानिक भाषा समजत नसेल तर त्याने काय करायचे? भाषेच्या आग्रहामुळे देशातील कुठल्याही नागरिकाची अडवणूक होता नये. म्हणून राष्ट्रभाषा हिंदी ही संवादाचे माध्यम ठरते आणि जी भाषा वेगवेगळ्या राज्यातील लोकांसाठी संवादाचे माध्यम ठरते त्या भाषेचा द्वेष का? सध्या महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाषेवरून वाद पेटलाय शाळांमध्ये हिंदीच्या सक्तीला मनसेने विरोध दर्शवला आहे. मनसेकडून मराठी भाषेचा आग्रह धरण्यात काही गैर नाही पण हिंदीला विरोध का? अर्थात मनसेने भलेही हिंदीला विरोध केला असला तरी. भाजपा, काँग्रेस, शिवसेनेचे दोन्ही गट, राष्ट्रवादीचे दोन्हीं गट यांचा मात्र हिंदीला पाठिंबा आहे. कारण राष्ट्रीय राजकारणात त्यांना हिंदीला डावलून पुढे जाता येणार नाही. हे त्यामागचे मुख्य कारण आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत कदाचित याच कारणावरून भाजपाने मनसेला दूर ठेवले. पण राज ठाकरेंचा मात्र वापर करून घेतला. यालाच म्हणतात बेरजेचे राजकारण! आता मुंबईसह राज्यातील अनेक मोठ्या महापालिकांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांना वेगवेगळे मुद्दे हवेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रामुख्याने नागरी सुविधाच्या प्रश्नांवर लढवल्या जातात. तरीही भाषेचा मुद्दा हा राज्याच्या अस्मितेशी जोडलेला असल्याने मनासारख्या छोट्या पक्षांसाठी हा मुद्दा महत्वाचा ठरतो. तर हिंदी भाषेला शालेय शिक्षणातून वगळण्याचा प्रयत्न झाल्यास महाराष्ट्र आणि हिंदी भाषिक पट्ट्यात भाजप आणि काँग्रेसलाही त्याचे परिणाम भोगावे लागतील. म्हणूनच केवळ महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजप आणि काँग्रेस हिंदीच्या विरोधात जाण्याची रिस्क घेणार नाही. या ठिकाणी आश्चर्य फक्त एकाच गोष्टीचे वाटते, ते म्हणजे राज ठाकरे अधून मधून भाजपच्या मूलभूत धोरणा विरोधी भूमिका घेत असताना, महाराष्ट्रातील नेते मात्र राज ठाकरे यांना दुःख वायला तयार नाहीत. अर्थात महायुतीमधील तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना मात्र भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची राज ठाकरेंशी असलेली सलगी मान्य नाही. त्यामुळे शिंदे सेना अजित दादा यांचा राष्ट्रवादी आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांचा सुद्धा मनसेशी एकोपा दिसला नाही. आणि भविष्यातही दिसणार नाही. आणि आता तर हिंदी भाषेला राज ठाकरेंनी केलेल्या विरोधामुळे भाजपतील हिंदी भाषिक कार्यकर्ते चांगलेच संतापले आहेत. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत ते मनसेबरोबर राहण्याचा प्रयत्न करतील असे वाटत नाही. भाजपा नेत्यांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार करायला हवा.

# राज्यातील २० आय.टी.आय.मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणार

## राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभागाचे तीन सामंजस्य करार



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील २० आय.टी.आय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे, सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळावे आयोजित करून रोजगार निर्मिती करणे, राज्यातील आयटीआय मध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यात येणार आहेत. कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि श्री. श्री. ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बेंगलोर, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन बेंगलोर, पुण्याची देआसरा फाउंडेशन, अंधेरी येथील प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले. मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर कौशल्य विकास विभागाचे सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा मंत्रीमंडळातील सदस्य, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, कौशल्य विकास आयुक्त नितीन पाटील व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, सहसंचालक सतीश सुर्यवंशी, श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त विजय हाके, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशनच्या सीएसआर प्रमुख रिचा गौतम, दामिनी चौधरी, प्रोजेक्ट मुंबईचे संचालक जलज दानी, दे आसरा या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पंडित उपस्थित होते.

**श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट,स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार**

युवकांना नवीन तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट तसेच स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला.श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट ही एक सेवाभावी संस्था असून ही संस्था प्रशिक्षणार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, लीडरशिप व व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगारासाठी तर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन सामाजिक दायित्व निधीद्वारे देशभरातील युवकांसाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार मिळवण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे कार्य करते. या कराराच्या माध्यमातून स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन या संस्थेतर्फे येणाऱ्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील २० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून इलेक्ट्रिशियन या व्यवसायाच्या कार्यशाळाची दर्जा वाढ करण्यात येणार आहे व याचबरोबर सोलार टेक्निशियन लॅब व इंडस्ट्रियल ऑटोमेशन लॅब उभारून देण्यात येणार आहे. तसेच स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन तर्फे राज्यातील वीजतंत्री व्यवसायाच्या सर्व शिल्प प्रदेशांना बेंगलोर येथे आधुनिक तंत्रज्ञान व सॉफ्ट स्किल्सचे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. राज्यातील विविध विभागांतील २० शासकीय आयटीआय केंद्रांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, नाशिक इत्यादी विभागांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत २०२५-२६ पासून पुढील चार वर्षात प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्येक वर्षी केंद्रांची संख्या आणि प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. पहिल्या वर्षात १० केंद्रांमध्ये १,५०० युवकांना, दुसऱ्या वर्षात १५ केंद्रांमध्ये २,२५०, तिसऱ्या वर्षात २० केंद्रांमध्ये ३,००० युवकांना आणि चौथ्या वर्षात देखील ३,००० युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९,७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.

**महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि देआसरा फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि पुणे येथील देआसरा फाउंडेशन या संस्थेसोबत उद्योजकता विकासाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि व्यावसायिक विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून पाठबळ देणे हा आहे. विविध जिल्ह्यांमध्ये उद्योजक मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांतून ५,००० लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट असून, यामध्ये इच्छुक उद्योजक, व्यवसाय सुरू केलेले इनोव्हेटर्स व प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्स सहभागी होतील.

देआसारा ही संस्था उद्योजकांना त्यांचा व्यवसाय सुरू करणे आणि वाढवण्यासाठी आवश्यक ती मदत व मार्गदर्शन करते. या सामंजस्य करारांतर्गत ही संस्था व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक साहाय्य, विपणन आणि आर्थिक साक्षरता, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे, उद्योजकांच्या क्षमता विकसित करणे आणि उद्योजकतेसाठी योग्य वातावरण तयार करणे हे काम करेल.

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व प्रोजेक्ट मुंबई सामाजिक संस्था यांच्यात सामंजस्य करार**

महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने आयटीआय मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. प्रोजेक्ट मुंबई ही संस्था विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय आहे. सामंजस्य करारांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय सोबत एकत्र येऊन दिव्यांग विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करणार आहे. या करारानुसार एक संयुक्त कार्य समिती स्थापन करण्यात येणार आहे, ज्यामध्ये पाच सदस्य असतील - त्यापैकी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून तीन आणि प्रोजेक्ट मुंबई कडून दोन सदस्यांचा समावेश असेल. ही समिती दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खास कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम तयार करेल, भारतीय सांकेतिक भाषांमध्ये अभ्यासक्रम विकसित करेल, शिक्षकांचे प्रशिक्षण घेईल आणि उद्योग भागीदारांच्या सहकार्याने ऑन द जॉब ट्रेनिंग कार्यक्रम आयोजित करेल.

# लोकसंख्या, महानगरांची होणारी वाढ, औद्योगिक क्षेत्रे यामुळे अग्निशमन सेवेचे कार्य आव्हानात्मक -राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

## राज्यातील ८ अग्निशमन अधिकारी, जवानांना राष्ट्रपती पदके प्रदान



**मुंबई/प्रतिनिधी**

वाढती लोकसंख्या, महानगरांची उर्ध्व दिशेने होणारी वाढ तसेच वाढती औदयोगिक क्षेत्रे यामुळे आग व इतर आपत्तींना तोंड देणे आव्हानात्मक झाले आहे. रसायनांमुळे उद्भवणाऱ्या आगी, औद्योगिक अपघात, नैसर्गिक संकट तसेच अतिरेकी हल्ल्यांमुळे अग्निशमन दलापुढे नवनवी आव्हाने ठाकत आहेत. या परिस्थितीत अग्निशमन सेवा दलापुढे पायाभूत सेवा-सुविधांचे रक्षण करणे, सार्वजनिक ठिकाणांची सुरक्षा जपणे व औद्योगिक संपदेचे संरक्षण करणे ही महत्वाची जबाबदारी आली आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले. राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त राज्यस्तरीय अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई अग्निशमन दलातील तसेच राज्याच्या इतर महानगर पालिका येथील ८ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते गुणवत्तापूर्ण अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले. अग्निशमन कार्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर तसेच ड्रोनचा वापर वाढविण्याबाबत अग्निशमन विभागाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे सांगताना दलाने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निरंतर कौशल्य वर्धन व प्रशिक्षण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. मुंबईसारख्या महानगरांमध्ये गृहनिर्माण संस्थांना अग्नी सुरक्षे संबंधी जनजागृती कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे तसेच गृहनिर्माण संस्था व औद्योगिक आस्थापनांचे नियमित फायर ऑडिट झाले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

**अग्निशमन संशोधन संस्था निर्माण करा**

अग्निशमन या विषयाचे सर्वकष अध्ययन करण्यासाठी एक संशोधन संस्था निर्माण केली पाहिजे, अग्निशमन कार्यात नवनवे तंत्रज्ञान वापरले पाहिजे तसेच अग्निशमन कार्यासाठी पर्यावरण स्नेही अग्निरोधक विकसित केले पाहिजे असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. अग्निशमन कार्यात सेवानिवृत्त अग्निशमन अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग केला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्ये युवकांसाठी कमी मुदतीचे अग्निशमन अभ्यासक्रम सुरु केले पाहिजे असे राज्यातील २९ सार्वजनिक विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपणास वाटते असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी राज्यपालांनी मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी दीपक घोष, सब ऑफिसर सुनिल गायकवाड, लिडींग फायरमन पराग दळवी, फायरमन तातु परब, पुणे महानगरपालिकेतील फायर इंजिन वाहनचालक करीमखान पठाण, सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेतील फायरमन कसप्पा लक्ष्मण माने व पुणे महानगरपालिकेतील फायर अटेंडण्ट नरसिंहा पटेल यांना राष्ट्रपति पदक प्रदान केले. यावेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या पोशाखाला अग्निशमन ध्वजाचे तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दलाचे, औद्योगिक आस्थापनांचे तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी उपस्थित होते. मुंबई डॉकयार्ड येथे सन १९४४ साली झालेल्या जहाजावरील स्फोटात प्राण गमावलेल्या अग्निशमन अधिकारी व जवानांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस पाळला जातो तसेच या दिवसापासून अग्निशमन सप्ताह पाळल्या जातो.

# लातूरमध्ये नंदनवन नागरी बेघर निवारा सुरु

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरातील बेघर नागरिकांसाठी बेघर निवारा सुरु करण्यात आला आहे. सदर निवाऱ्याची पाहणी महानगरपालिका आयुक्त देविदास जाधव यांनी केली आणि तेथे असलेल्या बेघर लोकांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी हा निवारा शहरातील बेघर लोकांसाठी लाभदायक होणार आहे. या ठिकाणी त्यांचेसाठी सर्व सुविधा देण्यात येणार असल्याचे तसेच या ठिकाणी पुरुष कक्ष, महिला कक्ष व अपंग कक्ष अशी वेगवेगळी राहण्याची सोय केली आहे याची त्यांनी पाहणी केली. सदर निवारा महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार सुरु करण्यात आला आहे. सदर निवारा शहरातील बेघर लोकांसाठी जसे बस स्थानक, रेल्वे स्टेशन, फुटपाथ, सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, कारखाना व कंपनी परिसर, रस्त्याच्या कडेला, पुलाखाली, बांधकाम साईट, मंदिर मस्जिद अशा ठिकाणी आश्रय घेणारे वृद्ध, अपंग, भिकारी, बालके, महिला, आजारी व्यक्ती, निराश्रित व्यक्ती, बेवारस आणि ज्यांना पूर्णतः उघड्यावर आश्रय घ्यावा लागतो अशा लोकांसाठी बेघर निवारा महानगरपालिका शाळा क्रमांक ४, ठाकरे चौक येथे सुरु करण्यात आलेला आहे. तरी शहरातील नागरिकांनी आपल्या कार्यालय परिसर, गल्लीमधील परिसरात अशी बेघर नागरिक दिसून आल्यास त्यांना नागरी बेघर निवारा ठाकरे चौक, मनपा शाळा क्र. ४ झोन कार्यालयाशेजारी विवेकानंद हॉस्पिटलच्या पाठीमागे किंवा ९०२८५९१७४५, ९९२३४५३६५७, ९८५०२०३२११ या मोबाईल नंबरवर संपर्क करावे.

# वाढवण बंदराच्या कस्टम दस्तऐवजीकरण अभ्यासक्रमाची पहिली तुकडी सुरू

**पालघर/प्रतिनिधी**

बंदरांच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या कस्टम प्रक्रिया, दस्तऐवजीकरण आणि प्रक्रियांचे व्यापक ज्ञान देण्यासाठी वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) ने बीसीबीएच्या सहकार्याने १६ एप्रिल पासून वाढवण पोर्ट स्किलिंग प्रोग्राम ऑन कस्टम डॉक्युमेंटेशन अंतर्गत पहिल्या एका महिन्याचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. बृहन्मुंबई कस्टम ब्रोकर्स असोसिएशन (बीसीबीए) च्या सहकार्याने तयार केलेला वाढवण बंदरासंबंधी हा अभ्यासक्रम सहभागींना बंदरांच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या कस्टम प्रक्रिया, दस्तऐवजीकरण आणि प्रक्रियांचे व्यापक ज्ञान देण्यासाठी सज्ज आहे. हा अभ्यासक्रम जेएनपीए आणि व्हीपीपीएलचे अध्यक्ष आणि व्हीपीपीएलचे सीएमडी उन्मेष वाघ यांनी राजीव सिन्हा, सल्लागार, जेएनपीए आणि व्हीपीपीएल, बीसीबीएचे अध्यक्ष संजीव हराळे, बीसीबीएचे वरिष्ठ उपाध्यक्ष परेश ठक्कर, एफएफएफएआयचे अध्यक्ष दुष्यंत मुलाणी आणि बीसीबीएचे इतर वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत आयोजित केला आहे. या



अभ्यासक्रमाची सुरुवात ही स्थानिक तरुणांची रोजगारक्षमता वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, त्यांना वाढवण बंदर आणि व्यापक सागरी उद्योगाच्या वाढीसाठी आवश्यक असलेली कौशल्ये प्रदान करणे. तरुणांना उद्याच्या संधींसाठी सुसज्ज करण्यासाठी संभाषणाच्या पलीकडे जाऊन अर्थपूर्ण कृती करण्यावर विश्वास ठेवतो. ही फक्त सुरुवात आहे आणि समुदायाला अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही विविध क्षेत्रांमध्ये या कार्यक्रमाचा आणि इतर अनेक कार्यक्रमांचा विस्तार करण्यास वचनबद्ध आहोत असे जेएनपीएचे अध्यक्ष आणि व्हीपीपीएलचे सीएमडी उन्मेष शरद वाघ यांनी सांगितले. कस्टम डॉक्युमेंटेशन कोर्स पालघर आणि वाढवण बंदराच्या जवळपासच्या भागातील उमेदवारांना कस्टम क्लिअरन्स आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात आवश्यक असलेले मूलभूत ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये प्रदान करण्यासाठी आकारला आहे. १०० तासांच्या प्रशिक्षणासह ४ आठवडे चालणारा हा अभ्यासक्रम मुंबईतील नरिमन पॉइंट येथील बीसीबीए कार्यालयात वर्गात आयोजित केला जात असून त्यात प्रत्यक्ष व्यावहारिक माहिती समाविष्ट आहे. या अभ्यासक्रमात आयात-निर्यात प्रक्रिया, सीमाशुल्क दस्तऐवजीकरण, मंजुरी प्रक्रिया आणि अनुपालन आवश्यकता यासारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे, ज्यामुळे सहभागींना बंदर आणि लॉजिस्टिक्स ऑपरेशन्सची वास्तविक जगाची समज मिळते. स्थानिक तरुणांना अर्थपूर्ण संधी प्रदान करण्याच्या उद्देशाने वाढवण पोर्ट स्किलिंग प्रोग्राम सुरू करण्यात आला. व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात, व्हीव्हीपीएल ने वाढवण मधील तरुणांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी व्हॉट्सअॅप चॅटबॉट सादर केला. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे संभाव्य उमेदवारांना माहिती मिळवणे आणि कार्यक्रमासाठी नोंदणी करणे सोपे झाले आहे. वाढवण पोर्ट स्किलिंग प्रोग्रामला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आजपर्यंत ३० हजार ८०० हून अधिक नोंदणी झाल्या आहेत. वाढवण पोर्ट स्किलिंग प्रोग्राम वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त तुकडीसह विकसित होत राहील, याची खात्री करून वाढवण मधील तरुण बंदराच्या विकासात आणि देशाच्या सागरी विकासात योगदान देण्यासाठी सुसज्ज असतील.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **अॅड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# वाडा तालुक्यातील दुर्गम भागात पाणी संकट



**वाडा/प्रतिनिधी**

उन्हाचा कडाका वाढल्याने वाडा तालुक्यातील दुर्गम भागातील गांव-पाडयांमद्ये मोठे पाणी संकट उभे राहिल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. मागील २०२४ वर्षाच्या तुलनेने यावर्षी (२०२५) फेब्रुवारी पासुनच भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. दुर्गम भागांमधील विहिर, कुपनलिका यांच्या पाण्याची पातळी खाली गेल्याने त्या कोरड्या पडल्या आहेत, जल-जीवन मिशन, लघुनळ, ग्रामपंचायत नळ यांसारख्या पाणी योजना अनेक ठिकाणी अपूर्ण व नादुरुस्त आहेत. तर काही ठिकाणी अद्यापही कार्यान्वित नाहीत. त्यामुळे येथील नागरिकांची पाण्यासाठी मोठी भटकंती होतानाचे विदारक चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. वाडा तालुक्यातील सध्यस्थितीत ओगदा, डाहे, तुसे या तीन ग्रामपंचायतीमद्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. तर उज्जैनी - आखाडा, उमरोठे (नदीपाडा), वरसाळे, कुयलू (तोरणे) या गावांत देखील पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असुन हि प्रस्तावित गावे असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान टंचाईग्रस्त भागातील पाण्याची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडून ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्याकडील माहितीच्या आधारे गांव पाड्यांना ३ ते ५ हजार लिटर क्षमतेच्या टाक्या उपलब्ध करून देत टँकरद्वारे नियमित पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती वाडा पंचायत समिती गटविकास अधिकारी वैभव शिंदे यांनी दिली आहे. ओगदा ग्रामपंचायतीची २८९० लोकसंख्या असुन येथे १० विहिरी, ९ कुपनलिका (हातपंप) गांव- पाड्यात आहेत. सागमाळ, दिवेपाडा, जांभूळपाडा, फणसगांव, टोकरेपाडा, मुहुमाळ, ताडमाळ, पाचघर या पाडयांमधील विहिरी, कुपनलिकांमधील 'जलस्त्रोत कोरडे पडल्याने फेब्रुवारी महिन्यापासुनच भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असुन मागील १० वर्षांपासून या पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.दरम्यान हे गांव - पाडे अधिक उंच व डोंगराळ भागावर असल्याने अनेकदा बोअरवेल मारून देखील पाणी लागत नाही. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी २ कि.मी तर पशुधनांना ४ किमी अंतरावर वणवण करण्याची वेळ ओढवत आहे. डाहे-कुंभिस्ते या ग्रामपंचायतीमद्ये २७ पाडे आहेत, तर २ हजार लोकसंख्येपैकी गवळी पाडा व कातकरी पाडा मिळून २८५ लोकवस्ती आहे. या दोन्ही पाड्यात एकच विहीर व चार कुपनलिका (बोअरवेल)असुन त्यांचे पाणी दुषित झाल्याने पिण्यायोग्य नाही. येथे एकदिवसआड टँकरने पाणी पुरवठा होत आहे.तुसे या ग्रामपंचायतीमधील फणसपाडा, तरसेपाडा, दोडेपाडा येथे देखील भीषण पाणी टंचाई उद्भवली आहे. दरम्यान पाण्याची टंचाईग्रस्त गांव-पाड्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. वाडा तालुक्यामध्ये तीन गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. दोन टँकरच्या मदतीने प्रतिदिन सहा फेऱ्या केल्या जातात. ज्या गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण होते तेथे प्रशासनाकडून तात्काळ उपाययोजना करत तेथे टँकर मंजूर करून पाणीपुरवठा केला जातो.तसेच ज्या गावांमध्ये बोरवेलला पाणी उपलब्ध होऊ शकतात तिथे बोरवेल घेण्यात येतात. आतापर्यंत १२ ठिकाणी बोरवेल घेण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर ११ नवीन लघु नळ योजनांचे काम पूर्ण झालेले आहे. तर १३ लघु नळ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे, असे वाडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वैभव शिंदे यांनी सांगितले.

# महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांचा लाभ घेण्याचे वसई-विरार महानगरपालिकेचे आवाहन




**विरार/प्रतिनिधी**

महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचे वेबसाईट द्वारे ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. वसई विरार पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. वसई-विरार शहर महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑनलाईन स्वरुपात मिळवता यावा यासाठी पोर्टलची सुरुवात करण्यात आली आहे. पोर्टलच्या माध्यमातून महिलांना खालील योजनांसाठी अर्ज करता येणार आहे. यामध्ये अनाथ व निराश्रीत मुलांना दत्तक घेतलेल्या पालकांना प्रोत्साहानात्मक अनुदान, विधवा, घटस्फोटित, निराधार परित्यक्ता महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान, सर्व वयोगटातील महिलांना डायलेसीस उपचारा करिता अर्थसहाय्य मिळणार आहे. तसेच एकाकी ज्येष्ठ निराधार वय वर्ष ६० वरील महिलांच्या उपजिविकेकरिता अनुदान, पालिका हद्दीतील कुष्ठरोग बाधीत कुटूंबाला त्यांच्या उदरनिर्वाहाकरिता अनुदान, अनाथ, निराधार मुलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य मिळेल. ज्या महिलेचे पती व्याधिग्रस्त असुन अंथरुणास खिळलेले आहे, अशा महिलेच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शैक्षणिक अर्थसहाय्य, कॅन्सरग्रस्त महिलेस उपचारासाठी अर्थसहाय्य, विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्ता महिलेच्या मुलांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य मिळेल. कोव्हीड-१९ रोगामुळे आई किंवा वडील मयत झाले असल्यास त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता शैक्षणिक अर्थसहाय्य, १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुला व मुलींना उपजिविकेकरिता अर्थसहाय्य, पालिका हद्दीतील एच आयव्ही / एड्स बाधीत पालकांच्या मुलांना शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसहाय्य, महिलांना मेमोग्राफी व पॅप स्मीअर चाचणी करण्याकरिता अर्थसहाय्य, अनाथ, निराधार मुलींना विवाह सोहळयासाठी अर्थसहाय्य यांचा समावेश आहे. या सर्व योजनांची पालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दैनंदिन अंमलबजावणी सुरू असून, याबाबतचे ऑनलाईन अर्ज करण्यासाठी खालील दिलेल्या क्यूआर वर स्कॅन करुन किंवा https://mahilabalkalyan.rtsvvmc.in या लींक वरुन अर्ज करु शकतात.

# भिवंडीत तलवार दाखवून दहशत माजवणारा पोलिसांच्या ताब्यात!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरालगतच्या खोणी गावात दोन हातात तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्या देविदास बाळाराम पाटील या माथेफिरू युवकास निजामपूर पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपीस शुक्रवारी भिवंडी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास तीन दिवसांची पोलिस कोठडी आरोपीस ठोठावली आहे.

# पालघर जिल्ह्यातील २५९ ग्रामपंचायती आपत्तीमध्ये देणार तात्काळ प्रतिसाद

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील २५९ ग्रामपंचायतीना आपत्ती प्रतिसाद किट वाटप करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी यांच्याकडे रवाना करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आगामी पावसाळ्यात अथवा नैसर्गिक आपत्तीच्या दरम्यान ग्रामपंचायत स्तरावर तात्काळ प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने हे आपत्ती व्यवस्थापन साहित्याचे संच उपयुक्त ठरणार आहेत. पालघर जिल्ह्यात ४७३ ग्रामपंचायती असून लक्षणीय लोकवस्तीपैकी समुद्रकिनारी तसेच नदीकिनारी असणाऱ्या ग्रामपंचायतींना पहिल्या टप्प्यामध्ये प्रतिसाद कीटचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये वाडा तालुक्यातील ७४, पालघर तालुक्यातील ६६, डहाणू तालुक्यातील ४९, वसई तालुक्यातील ३२, तलासरी तालुक्यातील १२, जव्हार तालुक्यातील ११, विक्रमगड तालुक्यातील आठ व मोखाडा तालुक्यातील सात ग्रामपंचायतींचा समावेश आहे. आपत्ती व्यवस्थापन किटमध्ये प्रथमोपचार किट, तरंगणारे व घडी घालता येणारे स्ट्रेचर (मोठे व मध्यम आकार), लाईफ जॅकेट, सेफ्टी हेल्मेट, गमबुट, हॅण्ड ग्लोज, सेफ्टी नेट, रेपलिंग रोप (३० मीटर) व किट ठेवण्यासाठी बॉक्स या साहित्याचा समावेश असून निवड केलेल्या ग्रामपंचायतीला प्रत्येकी एक बॉक्स देण्यात आलेला आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांचेकडून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर जिल्ह्याकडे २५९ आपत्ती प्रतिसाद किट उपलब्ध झालेल्या आहेत. या किटचा उपयोग आपत्ती घडल्यानंतर शोध व बचाव पथक आपत्ती स्थळी पोहचण्यापूर्वी होणारी जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी, ग्रामीण भागात आपत्तीला तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी ही किट संजिवनी ठरणार आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यात तलासरी व डहाणू तालुक्यात भूकंपाचे झटके बसत असून या जिल्ह्यातून वाहणाऱ्या अनेक नद्यांना पावसाळ्यात पूर येण्याचे प्रकार करतात. त्याशिवाय समुद्रकिनारी वसलेल्या गावांना चक्रीवादळाचा फटका बसण्याचे प्रकार देखील घडत असून अशावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राला तसेच जिल्ह्यात स्थित असणाऱ्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) च्या तुकडीला मदत करण्यासाठी स्थानिक पातळीवरील बचाव कार्य महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्यातील मुख्यालय ठिकाणी एनडीआरएफ ची ४५ सदस्यांची तुकडी गेल्या वर्षभरापासून तैनात ठेवण्यात आली आहे. या तुकडीमार्फत त्यांच्या सदस्यांचे नियमित प्रशिक्षण सुरू असते. याखेरीस पालघर जिल्ह्यातील शासकीय अधिकारी, नागरिक तसेच विद्यार्थ्यांना नागरी संरक्षण दल (सिव्हिल डिफेन्स) व एनडीआरएफ यांच्यामार्फत आपत्ती व्यवस्थापना दरम्यान शोध व बचाव तसेच प्रथमोपचार याविषयी प्रशिक्षण दिले जात आहे. एनडीआरएफ मार्फत



वेगवेगळ्या कवायती व मॉक ड्रिलचे आयोजन केले जात असून यामुळे बचावकार्यात सहभागी होण्यासाठी व्यवस्थेतील प्रतिनिधींचे बळकटीकरण करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडणाऱ्या स्वयंसेवकांसाठी ५०० आपदा मित्र भरण्याची योजना असून निवडल्या जाणाऱ्या स्वयंसेवकांना १२ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून लवकरच माहिती उपलब्ध केली जाणार आहे.

# भिवंडीत अखिल पद्मशाली समाजाच्या कार्यकारी मंडळ निवडणुकीस उच्च न्यायालयाची स्थगिती

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी या यंत्रमाग उद्योग नगरीत आंध्र प्रदेश तेलंगणा राज्यातील विणकर समाज अर्थातच पद्मशाली समाज मोठ्या संख्येने राहत आहे. या समाजाची भिवंडी शहरातील पद्मशाली समाजाची शिखर संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अखिल पद्मशाली समाजाच्या त्रैवार्षिक कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीस समाज बांधवांनी विरोध करीत उच्च न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने विद्यमान कार्यकारी मंडळाच्या घाईघाईत निवडणूक उरकून घेण्याचे मनसुबे उधळून लावत संपूर्ण निवडणूक कार्यक्रमास स्थगिती दिली आहे अशी माहिती ॲड.एस.पी.चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. अखिल पद्मशाली समाजाचे १७८२ आजीव सदस्य असून या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत ३१ मार्च रोजी संपली आहे. त्यासाठी विद्यमान पद्मवृक्षम पॅनल विरोधात पद्मावती



पॅनलने निवडणुकीत आव्हान उभे केले होते. दरम्यान ठाणे धर्मादाय आयुक्त कार्यालयात पद्मावती पॅनल कडून या निवडणुकीसाठी निःपक्ष निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करावा असा अर्ज २५ मार्च रोजी करण्यात आला होता. त्यावर २८ एप्रिल रोजी सुनावणी ठेवली असतानाच तत्पूर्वीच विद्यमान पद्मवृक्षम पॅनेलचे कार्यकारी मंडळाने घाईघाईत निवडणूक कार्यक्रम ६ एप्रिल रोजी जाहीर करीत १८ एप्रिल रोजी अध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष, खजिनदार व सरचिटणीस या चार पदांसाठी तर २७ एप्रिल रोजी २६ सदस्य पदासाठी मतदान घेतले जाणार होते. यास पद्मावती पॅनल चे प्रमुख मार्गदर्शक एस मल्लेशाम, मुरली मच्छा, सागर येल्ले यांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी विरोध करीत पुन्हा धर्मादाय आयुक्तांकडे दाद मागण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी सुनावणी न घेतल्याने अखेर उच्च न्यायालयात धाव घेतली.उच्च न्यायालयाने सर्व बाजू एकूण घेत संपूर्ण निवडणूक प्रक्रियेस स्थगिती देत धर्मादाय आयुक्तांनी २२ एप्रिल पर्यत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांनी पुढील दोन आठवड्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करून निवडणूक कार्यक्रम लावावा असा निर्णय दिला आहे अशी माहिती ॲड.एस.पी.चव्हाण यांनी दिली आहे. समाज मोठा आहे कोणी व्यक्ती समाजा पेक्षा मोठा नाही, समाजाचे हित न पाहणाऱ्यांना समाज शेवट पर्यत विरोध करेल हे या निर्णया तून स्पष्ट झाले असून यापुढे ही समाजाच्या न्याय हक्कासाठी लढा सुरू ठेवू अशी प्रतिक्रिया पद्मावती पॅनल चे अध्यक्ष पदाचे उमेदवार सागर येल्ले यांनी दिली आहे.

# दोनशे गरजू महिलांना साडी वाटप

**लातूर/प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पार्टीच्या वतीने २०० गरजू महिलांना साडी वाटप व खुषी ग्राम अनाथ आश्रममध्ये स्नेहभोजन करण्यात आले. पूज्य भंते महाथेरो पय्यानंदजी यांच्या शुभहस्ते साड्यांचे वाटप करण्यात आले. खुषी ग्राम अनाथ आश्रमामध्ये अन्नदान करण्यात आले. तसेच प्रत्येक जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बहुजन समाज पक्षाचे जिल्हा प्रभारी डॉ प्रा. अनिल कांबळे, जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, ज्योतीराम लामतुरे, कोषाध्यक्ष बामसेफचे सूर्यकांत कालेकर, बाळाराम मुंडे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश ओहळ, मिलिंद धावारे, राजकुमार मरे, महेंद्र कांबळे, भीम आर्मीचे मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे, ब्लू पँथर अध्यक्ष साधूभाऊ गायकवाड, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष विलास चक्रे, आतिश मांजरे, सागर साखरे, करण ओहाळ, सुरेश आण्णा वाघमारे, ॲड. संघमित्रा ओव्हाळ, कलावती डूमने, प्रतीक्षा सूर्यवंशी, नरसिंग बोडके बाबुराव गोडबोले, सूर्यभान राऊत, गौतम सोनकांबळे आदींची उपस्थिती होती.

# मोक्कातील गुन्हेगाराकडून अंमली पदार्थांची तस्करी



**कल्याण/प्रतिनिधी**

कल्याण जवळील आंबिवली इराणी वस्तीमधील एका गुन्हेगाराला पोलीस उपायुक्तांच्या अंमली पदार्थ विरोधी पथक आणि खडकपाडा पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने संयुक्त कारवाई करून मेफोड्रोन या अंमली पदार्थांची तस्करी करताना आंबिवली अटाळी भागातील बंदरपाडा भागातून बुधवारी संध्याकाळी अटक केली. हाशमी जाफर हुसैन जाफरी (३३) असे या गुन्हेगाराचे नाव आहे. मानपाडा पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यात हाशमीवर यापूर्वी संघटित गुन्हेगारी कायद्याने (मोक्का) कारवाई झाली होती. हाशमीवर महात्मा फुले पोलीस ठाण्यात यापूर्वीच दोन गुन्हे दाखल आहेत. मागील आठ महिन्यांपासून पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी कल्याण, डोंबिवली शहरात नशामुक्त अभियान सुरू केले आहे. कोणत्याही प्रकारच्या अंमली पदार्थांची तस्करी शहरात होता कामा नये. अंमली पदार्थाचा एकही अड्डा शहरात दिसता कामा नये यासाठी उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली एक फिरते अंमली पदार्थ विरोध पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक दररोज दिवस, रात्र शहरांच्या विविध भागात गस्त घालत असते. या पथकाच्या माध्यमातून आतापर्यंत एक हजाराहून अधिक अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या आणि तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील दारू, अंमली पदार्थांचे अड्डे उध्वस्त करण्यात आले आहेत. अशाच कारवाईचा भाग म्हणून विशेष अंमली पदार्थ विरोधी पथक आंबिवली अटाळी भागातील बंदरपाडा भागात गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना दुचाकीवरील एक इसम संशयास्पद हालचाली करत असल्याचे दिसून आले. पोलिसांना पाहताच तो गोंधळला. त्याला पळून जाण्याची कोणतीही संधी न देता गस्तीवरील पथकाने त्याला घेरले. त्याला याठिकाणी काय करतोस, तुला कुठे जायचे आहे असे प्रश्न केले. या प्रश्नांनी इसम गोंधळला. पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी पहिले त्याचे नाव विचारले. त्याने हाशमी जाफरी असे नाव सांगितले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली. त्यावेळी तो झडतीला नकार देत होता. परंतु, पोलिसांनी आक्रमक भूमिका घेताच त्याने झडतीस सहकार्य केले. त्यावेळी हाशमी जाफरीजवळून पोलिसांना १५ ग्रॅम वजनाचे मेफोड्रोन आढळून आले. बाजारातील या अंमली पदार्थाची किंमत तीस हजार रूपये आहे. पोलिसांनी हाशमीला तात्काळ ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल केला. हाशमीने एम. डी. पावडर कोठुन आणली होती. तो ती पावडर कोणाला विक्री करणार होता याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय नाईक, साहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, विजय गायकवाड, उपनिरीक्षक जितेंद्र ठोके, हवालदार अमित शिंदे, खुशाल नेरकर, राहुल शिंदे, अनंत देसले, सतीश मुपडे यांच्या पथकान ही कारवाई केली. गेल्या महिन्यात तमीळनाडूत चोरी करताना इराणी वस्तीमधील एका कुख्यात गुन्हेगार तमीळनाडू पोलिसांच्या चकमकीत ठार झाला होता.

# दुहेरी हत्याकांडातील हिरे व्यापाऱ्याला सुनावली जन्मठेपेची शिक्षा

**वसई/प्रतिनिधी**

प्रेयसी आणि तिच्या मुलाची हत्या करणाऱ्याला किरण मकवाना या हिरे व्यापाराला वसईच्या सत्र न्यायालयाने दोषी सिध्द ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. २०१५ मध्ये नालासोपारा पूर्वेच्या एव्हरशाईन येथे ही घटना घडली होती. किरण मकवाना (३७) हा हिरे व्यापारी आहे. तो सोनाली चेंबूरकर (३२) या महिलेसोबत लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये रहात होता. सोनालीचा मुलगा कुणाल हा देखील त्यांच्या सोबत रहात होता. १६ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी मकवाना याने घरातील हातोडी आणि चाकूने सोनालीवर वार केले. त्यावेळी सोनालीचा मुलगा कुणाल (१८) हा आईला वाचविण्यासाठी मध्ये पडला. मात्र मकवाना याने त्याच्यावर देखील वार केले. सोनाली आणि कुणाल मयत झाल्यानंतर मकवाना याने हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात मकवाना याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती.

या प्रकरणाची सुनावणी वसईच्या सत्र न्यायालयात झाली. तुळींज पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांनी या प्रकरणी तपास करून भक्कम पुरावे गोळा केले होते. परिस्थितीजन्य पुरावे,




हत्या प्रकरणात जप्त केलेला चाकू, आरोपीचा जबाब आदी पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले आणि किरण मकवाना याला दोषी सिध्द केले.न्यायालयाने किरण मकवाना याला कलम ३०२ प्रमाणे जन्मठेपेची शिक्षा आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास शिक्षेची तजवीज केली.एकही साक्षीदार नसताना आम्ही गोळा केलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालायने ही शिक्षा ठोठावली याबाबत कबाडी यांनी समाधान व्यक्त केले. आरोपीला फाशी व्हायला हवी होती असेही त्यांनी सांगितले. किरण मकवाना हा हिरे व्यापारी आहे. तो २०११ पासून नालासोपारा पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथील साई सेवा अपार्टमेंट मध्ये राहत होता. त्याची पत्नी त्याला सोडून गेली होती. त्याला जान्हवी आणि लक्ष अशी दोन मुले होती. न्यायालयाने या मुलांचा ताबा किरण मकवाना याच्याकडे दिला होता. दरम्यान किरण मकवाना याचे सोनाली चेंबूकर (३२) या महिलेशी प्रेमसंबंध निर्माण झाले होते. सोनाली तिचा मुलगा कुणाल (१८) याच्यासोबत मकवाना याच्यासोबत राहू लागली होती. परंतु सोनाली किरण मकवानाच्या दोन्ही मुलांना चांगली वागणूक देत नव्हती. त्यामुळे त्याची मुले त्याला सोडून आईकडे निघून गेली होती. त्यामुळे त्यांच्यात वाद निर्माण झाले होते.

21 TO 27 APRIL 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 4/19/2025 8:40 PM Page 1



## पान १ वरून....

### बहिणीच्या जावयाने अचूक साधला...

विठ्ठल हा एकटाच वारस आहे. मयत चंद्रव्वा हिची बहिण जवळच्या गावात राहत असल्याने तिचा जावई सुरेश सवदत्ती हा चंद्रव्वाच्या घरी येत जात होता. तो आणि चंद्रव्वाचा मुलगा विठ्ठल हे दोघे जण कायम दारू प्यायला शेतात कायम एकत्र बसत होते. दोघे ही मेहुणे पाहुणे असल्याने दोघांत लपवण्यासारखे काहीच नव्हते. दोघे ही मेहुणे पाहुणे असले तरी दोघे ही मित्रासारखे राहत होते. त्यातच गेल्या वर्षी वयोवृध्द चंद्रव्वा हिचा रोड अपघात झालेला होता. त्यात तिचा पाय मोडला असल्याने तिच्या खुब्याचे ऑपरेशन झालेले होते. त्यामुळे तिला नीट बसता उठता येत नव्हते. त्यातच विठ्ठल हा जरा खुळ्यासारखे वागत होता. त्याच्या ही बायकोचे गेल्या काही वर्षापूर्वी निधन झाल्याने तो खचुन गेलेला होता. त्यामुळे त्याचे वागणे हे थोडे विक्षिप्त असल्यासारखे होते. त्या दोघांची परिस्थीती ही सुरेश सवदत्ती याला माहिती होती. तो आपला मित्र श्रीशैल होरट्टी याला शेणगुत्ती हून घेऊन येऊन विठ्ठल बरोबर दारू पित बसत होता. शेणगुती आणि कोडगनुर तसे म्हणायला गेले तर फारसे काही लांब नव्हते. त्यामुळे ते दोघे ही आठवडयातून दोन तीन वेळा तरी दारू साठी एकत्र येत होते. दारू पिता पिता त्याची त्या दोघांची घरातील वेगवेगळ्या समस्येवर चर्चा होत होती. दोघांच्या ही घरात काय शिजत आहे हे दोघांना ही समजत होते. चंद्रव्वाचा अपघात झाल्यावर सुरेश सवदती यानेच विठ्ठल याला अपघात करणाऱ्या दुचाकी स्वारवर केस घालायल लावून त्याच्याकडून दोन लाख रूपये नुकसान भरपाई मागण्यास सांगितले. तसे विठ्ठल याने केले देखील.त्याने आईचा अपघात करणाऱ्या दुचाकी स्वारवर केस दाखल करून मोठी रक्कम मागितलेली होती. ही केस कोर्टात असल्याने त्या केस मध्ये नाही होय म्हणत तडजोड चाललेली होती. ही गोष्ट सुरेश सवदती याला कळालेली होती. त्यातील काही पैसे त्याने विठ्ठलकडे उसणे मागितलेले होते. त्यावेळी विठ्ठल याने पैसे देण्यास नकार दिलेला होता. याचा राग सुरेश याला आला होता. एवढी सगळी प्रॉप्रटी असून देखील पैशासाठी विठ्ठल आणि त्याची आई कजुंषपणा करीत आहेत हे त्याच्या लक्षात आले होते. विठ्ठल हा त्या सगळ्या प्रॉप्रटीचा मालक आहे हे त्याच्या लक्षात आले होते आणि तो मालक असून देखील आपल्याला पैसे देत नाही. हे त्याला खटकले होते.याला चांगलेच धडा शिकवायला पाहिजे असा त्याने विचार केला. हा विचार त्याने मित्र श्रीशैल होरट्टी याला बोलून दाखविला कसे केले तर मी त्या घराचा जावाई आहे.चंद्रव्वा आणि विठ्ठल याच्या माघारी ती सगळी प्रॉप्रटी आपल्याला मिळेल अशी आशा आणि खात्री त्याला होती. ही गोष्ट सवदती याने मित्र श्रैशैल याला सांगितली. त्याला देखील ही गोष्ट पटली.त्या दोघांनी मिळून विठ्ठल इचेरी याला मारण्याचा प्लॅन केला. नेहमीप्रमाणे दोघे ही रविवार दि.१३ एप्रिल दोघे ही शेणगुतीहून कोडगनुर येथे विठ्ठलकडे दुपारी आले. ते तिघे मळ्यातील घराच्या पाठीमागे दारू प्यायला गेले. दुपारी दारू प्यायला बसलेले ते तिघे ही दारू पिताना सुरू लावून धरले होते. त्यावेळी त्या दोघांनी ही मुद्दामच विठ्ठल याला जास्तच दारू पाजली. दारूच्या नशेत मेहुणे पाहुण्यात वादाला सुरूवात झाली. त्या वादात सुरेश आणि श्रीशैल यांनी विठ्ठल याला लाथाबुक्कयांनी मारहाण करायला सुरूवात केली. त्यात त्या दोघांनी ही विठ्ठल याचा गळा आवळून धरला तो ओरडत असताना सुरेश सवदती याने विठ्ठलच्या पोटात चाकूने वार केला. त्या सरशी तो ओरडत जागीच रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडला. त्याचा जागेवरच मृत्यु झाल्याचे बघून त्यांना घाम सुटला. बराच वेळ ते दोघे ही शांत विचार करीत बसले. बराच वेळ झाला तरी ते तिघे ही कसे काय असून घराकडे परत आले नाहीत म्हणून चंद्रव्वा ही त्यांना शोधायला शेताच्या मागे गेली असता तिला मुलगा विठ्ठल याला रक्ताच्या थारोळ्यात पडलेला बघून त्या ओरडू लागल्या. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने शेजारी येतील या भितीने सुरेश आणि श्रैशैल यांनी चंद्रव्वाच्या तोंडावर हात धरून तिचा ही गळा जोरात आवळून धरला. तीचा ही गळा जोरात आवळल्याने तिचा श्वास गुदमरला गेल्याने तिचा ही जागीच मृत्यु झाला. त्या दोघांना ही मारून सुरेश आणि श्रैशैल हे दोघे ही घटनास्थळावरून पळून गेले. इकडे रात्रीच्या अंधारात एकजण इचेरी याच्या मळ्यात गेला त्याला विठ्ठल आणि त्याची आई चंद्रव्वा हे दोघे ही रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. त्याने या घटनेची माहिती मळ्यातील शेजारील लोकांना दिली. ते ही तातडीने घटनास्थळी पळत आले. कोडगनुर गावात माय लेकाचा खून झाल्याची माहिती गावातील लोकांना मिळाल्यावर लोकांनी घटनास्थळी गर्दी केली या घटनेची माहिती ऐगळी पोलीसांना दिल्यावर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोलीस उपाअधिक्षक प्रशांत मुन्नोळी, पोलीस निरी.संतोष हळुर, उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ, कुमार हडकर, शिवानंद नागनुर यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. या दुहेरी खूनाच्या घटनेने अथणी तालुक्यात खळबळ उडाली. ऐगळी पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी अथणी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले.घटनास्थळी संशयीत आरोपीनी कोणताही पुरावा सोडला नसल्याने या घटनेचा तपास करताना पोलीसांना अडचणी येत होत्या.पोलीसांनी या घटनेची माहिती मयत चंद्रव्वा यांच्या नातेवाईकाकडून घेतली.परंतु कोणता ही सुराग सापडत नव्हता. मयताच्या नातेवाईकांनी पोलीसांना माहिती दिली की, मयत चंद्रव्वा हिचा गेल्या दोन वर्षी रस्ता अपघात झालेला होता. ती केस कोर्टात होती. या केसमध्ये समेट घडवून आणण्यात आले होते. त्यातील काही रक्कम चंद्रव्वा हिला मिळणार होती. त्यातूनच ही घटना घडली असावी अशी शंका नातेवाईकांनी व्यक्त केली. त्या दृष्टीने पोलीसांनी तपास चालू केला होता. परंतु त्यात काही यश मिळत नव्हते. या घटनेतील संशयीताचा शोध घेण्यासाठी पोलीसांनी गुप्त खबऱ्यांना कामाला लावले होते.ही घटना घडून पाच सहा दिवस झाले तरी यातील संशयीत काही हाती लागत नव्हते. त्यातच गुप्त खबऱ्याने ऐगळी पोलीसांना माहिती दिली की, मयत विठ्ठल आणि शेणगुती येथील त्याचा पाहुणा आणि त्याचा मित्र श्रीशैल हे तिघे जण घटनेच्या दिवशी दारू प्यायला बसले होते. या माहितीवरून पोलीसांनी त्याचा शोध सुरू केला त्यावेळी पोलीसांना माहिती मिळाली की, यातील सुरेश याने या दुहेरी खूनाच्या घटनेनंतर गळफास घेऊन आत्महत्या केली.तर श्रीशैल याने देखील आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्याचा जीव वाचला होता.त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीसांना मिळाली. तो उपचार घेत असलेल्या अथणी येथील दवाखान्यात पोलीसांनी धाव घेत त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली. मयत चंद्रव्वा हिच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून चंद्रव्वा इचेरी (वय ६८) आणि विठ्ठल इचेरी (वय ४५) याच्या खून प्रकरणी मयत सुरेश सवदती (वय ३८) आणि श्रीशैल होरट्टी (वय ४०) रा.दोघे ही शेणगुती तालुका अथणी याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. उपचारानंतर श्रीशैल होरट्टी याला ताब्यात घेऊन पोलीसांनी त्याला कोर्टात उभे केले.मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली.या घटनेचा पुढील तपास अथणी पोलीसा बरोबर ऐगळी पोलीस करीत आहेत. संपत्तीच्या आशेपाटी सुरेश सवदत्ती याने विठ्ठल याला मारण्याचा कट रचला परंतु त्याच्या शोधासाठी तेथे आलेली वयोवृध्द चंद्रव्वा आल्याने तिचा ही त्यांनी घात केला. आशा ही कधी वाईटच असते.त्यातच दारूच्या व्यसन लागले की,त्या नशेत कधी कोणती गोष्ट करतील हे काही सांगता येत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

### आई-वडिलांना शिवी देणे नाही ...

घडली होती. या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास भिवंडी गुन्हे शाखेच्या वतीने करण्यात येत होता. भिवंडी गुन्हे शाखेने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे केलेल्या तपासातून या हत्येतील आरोपीच्या मुसक्या मध्य प्रदेशातील कटनी येथून आवळून आरोपीस अटक केली असल्याची माहिती भिवंडी गुन्हे शाखेने गुरुवारी दिली आहे. रवीकुमार विष्णू सिंग वय २९ वर्ष रा. कदमटोली जिल्हा जसपुर, राज्य छत्तीसगढ असे अटक आरोपीचे नाव आहे तर चित्तरंजन नागेशिया वय ३० वर्ष राहणार कदम टोली असे हत्या झालेल्या दुर्दैवी इसमाचे नाव आहे. आरोपी रविकुमार व मयत चित्तरंजन हे दोघेही एकमेकांचे साथीदार असून भादवड येथील दत्तु नगर परिसरात राहत होते. काही दिवसांपूर्वी दोघेही एकत्र दारू पिण्यास बसले असताना मयत चित्तरंजन याने आरोपी रवी कुमार यास आई-वडिलांवरून शिवीगाळ केली होती. या गोष्टीचा राग म्हणून मनात धरून रविकुमार याने दगडाने ठेचून व धारदार हत्याराने चित्तरंजन याची हत्या केली व मध्य प्रदेश येथे पळून गेला होता. भिवंडी गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपी रविकुमार हा मध्य प्रदेश येथे पळून गेला असल्याची खबर मिळताच भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज केदार पोलीस हवालदार साबीर शेख सुनील साळुंखे प्रकाश पाटील वामन भोईर निलेश बोरसे सचिन जाधव सुदेश घाग पोलीस शिपाई उमेश ठाकूर भावेश घरत अमोल इंगळे चालक पोलीस शिपाई रवींद्र साळुंखे यांच्या पथकाने आरोपीचा तपास करून मध्य प्रदेश येथील कटनी रेल्वे स्टेशन येथून सीआरपीएफ पोलिसांच्या मदतीने पळून जाण्याचा तयारीत असलेला आरोपी रवीकुमार यास अटक केली.

### कर्जाची परतफेड वेळेवर नाही...

त्याचा दोन नंबर धंदयात हात असल्याने त्याच्यावर अनेक गुन्हे त्यावेळी दाखल होते. त्यावेळी जिल्हा पोलीस प्रमुखांनी त्याचेवर हद्दपारीचा प्रस्ताव मंजुर केला होता. सिद्धिविनायक हा त्याचेकडे कामाला असल्याने आणि तो बेपत्ता असल्याची तक्रार दाखल झाली असल्याने पोलीसांची प्रथमदर्शनी संशयाची सुई त्याच्यावरच होती. परंतु या प्रकरणात तो पोलीसाना चकवा देत होता. त्याचेकडून बिडवलकर याच्या बद्दलची माहिती पोलीसांना मिळत नव्हती. जिल्हा पोलीस प्रमुखांनी बिडवलकर याच्या बेपत्ता आणि अपहरणाची गंभीर दखल घेतली असल्याने निवती पोलीसाबरोबर कुडाळ पोलीस ही बिडवलकर याचा शोध घेत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषणनेचे पोलीस ही त्याचा शोध घेत होते.गेली दोन वर्ष त्याचा शोध घेत असताना बिडवलकर याला आभाळाने गिळले की जमीनीने खाल्ले असा प्रश्न पोलीसांच्या समोर उभा होता. कसोशीने पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सिद्धिविनायक उर्फ पक्या हा कर्जबाजारी झालेला असल्याची माहिती त्यांना मिळाली. तसेच सिध्देश शिरसाट याचेकडे काम करीत असताना सिद्धिविनायक बिडवलकर याने ५१ हजार रूपये हात उसणे घेतलेले होते. तसेच माणगांव येथील गणेश कृष्णा नार्वेकर याच्याकडून ही सिद्धिविनायक याने २१ हजार रूपये घेतलेले होते. शिरसाट आणि नार्वेकर यांनी बिडवलकर याला दिलेली रक्कम ही व्याजापोटी दिलेली होते. त्याचे व्याज त्यांनी भरमासाट लावलेले होते. घेतलेल्या रक्कमेपेक्षा त्याचे व्याजच दुप्पट झाल्याने बिडवलकर याला ती रक्कम देण्यास अडचण येत होती. तो ते पैसे देण्यास त्यांना आजचे उदया असे करीत होता. काही केल्या तो त्याचे पैसे परत देत नसल्याने शिरसाट आणि नार्वेकर यांना बिडवलकर याचा राग येत होता. ते दोघे ही त्याच्याकडे पैसे मागून दमलेले होते. त्याच्यासारख्या कसलेल्या माणसांना बिडवलकर हा घेतलेले पैसे देण्यास दमवत असल्याने त्या दोघांनी बिडवलकर यांना दम भरण्यास सुरूवात केली. काही ही करून आमचे घेतलेले पैसे व्याजासह परत कर नाही तर आम्ही तुला जिवंत ठेवत नाही अशी धमकी शिरसाट आणि नार्वेकर यांनी बिडवलकर याला दिलेली होती. त्यामुळे बिडवलकर हा घाबरून होता. सिद्धेश शिरसाट याचे अवैद्य दारू विक्री करीत असताना बिडवलकर हा पोलीसांना सापडला होता. त्या केसमधून ही त्यांनी त्याला बाहेर काढले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस बिडवलकर याचा शोध घेत असताना त्यांनी दोन तीन वेळा शिरसाट आणि गणेश नार्वेकर याच्याकडे चौकशी केलेली होती. परंतु त्यावेळी त्याच्या चौकशीतून पोलीसांच्या हाती त्यावेळी फारसे काही लागले नव्हते. बिडवलकर याचे बेपत्ता होऊन दोन वर्ष झाले. पोलीस तपास मात्र थांबला नव्हता. अखेर पोलीस या गुन्हयाच्या खोलात गेल्यावर संशयाची सुई सिध्देश शिरसाट याच्यापर्यत पोहचत होती.एप्रिल २०२५ मध्ये पोलीसांनी संशयावरून सिध्देश शिरसाट याला ताब्यात घेतल्यावर त्याने आपण चौघांनी मिळून सिद्धिविनायक बिडवलकर याचे पैशाच्या कारणातून अपहरण केल्याची माहिती पोलीसांना दिली. त्याच्या धक्कादायक खुलाशाने पोलीस ही चक्रावून गेले. सिध्देश शिरसाट गणेश नार्वेकर या दोघांना आणि त्याचे मित्र सार्तोडा येथील सर्वेश केरकर पिंगुळी येथील अमोल उर्फ वल्लभ श्रीरंग शिरसाट अशा चौघांना कुडाळ पोलीसांनी सिद्धिविनायक बिडवलक याचे अपहरण करून खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी ताब्यात घेतले. दि.९ मार्च २०२३ रोजी सिध्देश शिरसाट आणि गणेश नार्वेकर यांनी सिध्दिविनायक बिडवलकर याला कुडाळ तालुक्यातील चेंदवण येथील नाईकनगर येथील त्याच्या राहत्या घरातून उचलले. त्याला कुडाळ येथील अमोल शिरसाट याच्या पंचायत समिती मागील घरात आणून जबर मारहाण केली. तो त्याचे घेतलेले पैसे परत देत नव्हता म्हणून अमोल शिरसाट याच्या घरात त्याला त्यांनी पुर्णपणे नग्न करून मारहाण केली. त्या मारहाणीचा त्यांनी व्हिडीओ बनविला.त्यांनी केलेल्या मारहाणीत बिडवलकर याचा मृत्यु झाला होता. आता त्याच्या मृतदेहाचे काय करायचे असा प्रश्न त्याच्या समोर होता.त्यावेळी त्यांनी रातो रात एक कार भाडयाने केली.त्याचा मृतदेह त्या कारमध्ये ठेवला आणि सावंतवाडी सार्तोडा येथील आपला मित्र सर्वेश केरकर याच्या घराकडे नेला. त्याने सार्तोडा येथील बाजार पेठ नजीक असणाऱ्या स्मानशभुमीत बिडवलकर याचा मृतदेह नेवून जालून टाकूया असा सल्ला त्यांना दिला. त्यानुसार त्या चौघांनी सार्तोडा येथील स्माशनभुमीत बिडवलकर याचा मृतदेह जाळून टाकला. तेथील स्माशनभुमीत असणाऱ्या व्यवस्थापकला त्यांनी बिडवलकर हा पाहुणा असल्याचे सांगून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट त्यांनी लावली. त्यानंतर पहाटे पहाटे त्याची राख व हाडे त्यानी जवळच्या तेरखोल नदीत टाकून सगळा पुरावा नष्ट केला.जणू काही घडलेच नाही अशा अविर्भावात ते चौघेजण गेली दोन वर्ष वावरत होते. परंतु गुन्हेगार हे कितीही चालाख आणि हुशार असले तरी पोलीस त्याच्या पुढे दोन पाऊले असतात हे त्यांना माहित नव्हते. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक सौरभ अग्रवाल सावंतावाडी उप विभागीय पोलीस अधिकारी विनोद कांबळे याच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.निरी.राजेंद्र पाटील कुडाळ पोलीस स्टेशनचे पो.निरी.राजेंद्र मगदुम निवती पोलीस ठाण्याचे स.पो.नी.भीमसेन गायकवाड यांनी करीत संशयीतांच्या मुसक्या आवळून अखेर दोन वर्षानी या गुन्हाला वाच्या फोडली. माधवी चव्हाण हिने निवती पोलीस स्टेशनला सिध्दिविनायक बिडवलकर हा बेपत्ता झाला असल्याची तक्रार नोंदवली होती.तिच्या तक्रारीवरून पोलीस त्याचा शोध घेत होते. बिडवलकर हा अवैद्य दारू विक्री करणाऱ्या सिध्देश हा काम करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच संशयाची सुई सिध्देश शिरसाट याच्या भोवतीच फिरत होती. परंतु पोलीसांच्याकडे पुरावा काही नव्हता. परंतु ज्यावेळी सिध्दिविनायक याने शिरसाट यांच्याकडून ५१ हजार आणि गणेश नार्वेकर याच्याकडून २१ हजार रूपये घेतले असल्याची माहिती पोलीसांना लागली त्याचवेळी या दोघांनी सिद्धिविनायक बिडवलकर याचा घातपात केला असल्याची शंका पोलीसांना आली. गेली दोन वर्ष पोलीस या प्रकरणाचा तपास वेगवेगळ्या ॲंगलने करीत होते. त्यातच कुडाळ येथील पंचायत समिती मागील अमोल शिरसाट याच्या मालकीच्या घरात सिध्दिविनायक याला त्यांनी नग्न करून मारहाण केली ते घर ही एका बँकेने कर्जापोटी सील केले होते याची ही माहिती पोलीसांना मिळाली होती. कुडाळ पोलीसांनी या चौघांना ताब्यात घेतले होते.माधवी चव्हाण याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी कुडाळ पोलीसात सिध्दिविनायक बिडवलकर (वय ३५) याचे अपहरण करून खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी सिध्देश शिरसाट रा.कुडाळ, अमोल शिरसाट रा.कुडाळ, सर्वेश केरकर रा.सार्तोडा आणि गणेश नार्वेकर रा.माणगाव याच्या विरोधात भा.द.वी. कलम ३०२,१२०.ब आणि २०१ हे त्यावेळच्या गुन्हाप्रमाणे गुन्हा नोंदवून कुडाळ पोलीसांनी या चौघांना ही कुडाळ येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने या चौघांना १५ एप्रिल २०२५ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली. यावेळी सरकारी वकील ॲड.मेघा परब यांनी सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात बाजु मांडताना सांगितले की, या गुन्हयात संशयीतांनी बिडवलकर याला ज्या पाईपने मारहाण केली ती पाईप अजून पोलीसांनी जप्त केलेली नाही. शिवाय मयत सिध्दिविनायक बिडवलकर याच्या डीएनएचे रिर्पोट अजून येणे बाकी आहे. तसेच संशयीतांच्या अवाजाचे नुमने अजून घ्यायचे असल्याने यातील अन्य साथीदार आणि कोणी आहेत का? याचा तपास अजून पोलीसांनी केलेला नाही अजून साक्षीदारांचे साक्ष अजून नोंदवायचे असल्याने यातील संशयीतांची पोलीस कोठडीची मागणी त्यांनी न्यायालयात केली. तर संशयीत आरोपीच्या वतीने ॲड.विवेक मांडकुलकर यांनी युक्तीवाद कोर्टात केला. दि.२७ फेब्रुवारी २०२३ला खूनाचा गुन्हा नोंद असताना आताच का? गुन्हा दाखल केला गेला पोलीसांना तपासासाठी पुरेसा वेळ मिळालेली नाही हे म्हणणे योग्य नसल्याचे त्यांनी युक्तीवाद करताना मांडला. गुन्हा घडून दोन वर्ष झाली मग आता खूनाचा गुन्हा का दाखल केला गेला असा युक्तीवाद करताना त्यांनी संशयीत हे आरोपी नसल्याचे कोर्टात म्हटले. खरे तर यातील संशयीत हे निर्ढावलेले आणि मस्तीखोर आहे त्यांनी माणुसकीला काळीमा फासणारा गुन्हा केला आहे. त्यांना पैशाची फार मस्ती आहे असे सरकारी वकील ॲड.मेघा परब यांनी म्हटले असून संशयीतांना या गुन्हयात जास्ती जास्त शिक्षा व्हावी ही मागणी त्यांनी केली. शिवाय सिद्धिविनायक बिडवलकर याला अमानुषपणे नग्न करून मारहाण केल्याची व्हिडीओ सोशल मिडियावर टाकले गेल्याने मोठी खळबळ उडाली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास कुडाळ पोलीस करीत आहेत.

## पान ८ वरून....

### ऑलिम्पिकसाठी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ...

असे सांगून आपल्या मनोगतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिवछत्रपतींच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार सर्वच पुरस्कार्थींचा अभिमान वाढवणारा आहे. पदकांची भरारी आपण सुरू केली आहे. राष्ट्रीय खेळाडूंची आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरी उंचवावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. चांगल्या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी आपण परदेशी पाठवतो पण आता त्यांच्यासोबत त्यांचे प्रशिक्षक, फिजिओ यांनाही परदेशी जाता येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्यासाठी हे गरजेचे आहे. खेळाडूंच्या सन्मानासाठी पारितोषिक रक्कम वाढवणे व थेट नियुक्त आपण देत आहोत. खेळासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. तालुक्यापर्यंत चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करत आहोत. महाराष्ट्राच्या खेळाडूंची सर्वोत्तम कामगिरी होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दरवर्षीचा पुरस्कार सोहळा त्याच वर्षी झाला पाहिजे अशी माझी क्रीडामंत्री, अधिकार्यांना विनंती आहे. आगामी पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा विभागाला वाढीव रक्कम मंजूर करून त्यांची मागणी पूर्ण केली जाईल. सर्व पुरस्कारार्थींचे मनापासून अभिनंदन करतो. तुम्ही खेळाडू घडवण्याचे काम करा आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहू. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करणार्या खेळाडूंचे कौतुक करून नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणे हा या क्रीडा पुरस्कार सोहळ्याचा मुख्य उद्देश असे सांगून राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पुरस्कारार्थींच्या नावापुढे छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जोडले जाणार आहे. त्यामुळे सर्व पुरस्कारार्थींना आयुष्यभर त्याचा अभिमान वाटेल. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव कामगिरी करणार्या खेळाडूंना चांगली पारितोषिक रक्कम आणि थेट नियुक्ती देत क्रीडा क्षेत्रासाठी पोषक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाचे प्रास्तविक क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले तर आभार प्रदर्शन अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी केले.

### लातुरात आयएमएचा पदग्रहण सोहळा ...

लागू होईल. डॉक्टरांच्या इतर मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठीही आपण तत्पर असल्याचे यावेळी बोलताना सांगितले. यावर समाधान व्यक्त करत लातूरचे लोकप्रतिनिधी म्हणून नूतन अध्यक्ष डॉ. कदम यांनी बॉम्बे नर्सिंग होम अधिनियम रजिस्ट्रेशन बाबत असलेल्या अडचणी तात्काळ दूर व्हाव्यात तसेच यातील नूतनीकरणाची मुदत ३ वरून ५ पाच वर्षांची करावे, लातुरात आयएमए भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी आदी मागण्या मांडण्यात आल्या, यावर आमदार अमित देशमुख यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले. यावेळी महिला अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ यांनी महिला वर्गातील आजरांची संख्या पाहता येणाऱ्या काळात आपण महिलांच्या आरोग्यासाठी काम करणार असल्याचे यावेळी सांगितले. याप्रसंगी डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. आरदवाड, डॉ. सरिता मंत्री, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. अजय जाधव, डॉ रमेश भराटे, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. तोषणीवाल, डॉ. भाऊराव यादव, डॉ. सुरेखा निलंगेकर, डॉ. दाताळ, डॉ. वसुधा जाजू, डॉ. माधुरी कदम, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. सलगर यांच्यासह लातूर आयएमएचे जवळपास २५० सदस्य सोहळ्यासाठी उपस्थित होते.

### वाहतूक पोलिसांच्या वर्दीत 'बॉडीवॉर्न ...

यंत्र काम करत असल्याने ते दररोज वापरणे शक्य होणार आहे.यात जवळपास ३० दिवस डेटा जमा करण्याची सोय असणार आहे. त्यामुळे एखाद्या प्रसंगी या कॅमेऱ्यामुळे पुरावे गोळा करण्यास पोलिसांना मोठी मदत मिळणार आहे. बॉडीवॉर्न कॅमेरे हे जीपीएस प्रणालीद्वारे विकसित करण्यात आले आहेत. त्यामुळे हे कॅमेरे थेट पोलीस नियंत्रण कक्षासोबत जोडण्यात आले आहे. यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांसोबत नियंत्रण कक्षाला परिस्थितीची लाईव्ह माहिती घेणे शक्य होणार आहे. याशिवाय ट्राफिक जंक्शन, महामार्ग आणि संवेदनशील घटनांना रेकॉर्ड करण्यासाठी या कॅमेऱ्यांची मोठी मदत होणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

### मोदी सरकारच्या अन्यायकारक ...

उचलून दिलासा द्यावा असे काँग्रेस जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. केंद्रातील मोदी शासनाने द्वेषपूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची मालमत्ता मनमानी पद्धतीने जप्त केली. नेशनल हेराल्ड ह्याबाबत प्रक्रिया सुरू आहे, हे नवीन नाही. ही केस जेव्हा सुरू झाली, तेव्हाच मी बोललो होतो की हा मोठा विचित्र मामला आहे. ही केस बिना एक रुपया, बिना एक रुपयाची प्रॉपर्टीचे स्थानांतरणचा मामला आहे असेही शेवटी निवेदनात म्हटले आहे.

### आशा स्वयंसेविका आरोग्य सेवेच्या...

अधिकारी सुनील कवठेकर हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, धकाधकीच्या जीवनशैलीमुळे लोक तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे विविध आजार उद्भवतात. अशा दंत आजारावर वेळीच होणे आवश्यक असते. त्याअनुषंगाने जागरूकता निर्माण करण्याचे कार्य आशा कार्यकर्त्या उत्कृष्टपणे करत आहेत. त्यांच्या योगदानामुळे आरोग्य सेवा प्रत्येकाच्या दारात पोहोचत आहे. यावेळी उपस्थित आशा स्वयंसेविकांनी दंत आरोग्य जागृती बद्दल विचारलेल्या प्रश्नाला होकारार्थी प्रतिसाद देत यापुढील काळात मौखिक आरोग्याविषयीच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आश्र्वासन दिले. या प्रसंगी डॉ. एकनाथ माले यांनी सामान्य आरोग्य आणि आवश्यक उपचार याविषयी मार्गदर्शन करुन यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील विविध उपचार शाखा व उपलब्ध सुविधांविषयी माहिती दिली. तसेच बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. प्राजक्ता गायकवाड यांनी बाल दंत आरोग्य या विषयी, मुख औषध व क्ष - किरण शास्त्र तज्ज्ञ डॉ. अभय कुलकर्णी यांनी मौखिक आरोग्याचे महत्त्व, प्राथमिक तपासणीचे तंत्र आणि आरोग्य जनजागृतीच्या पध्दती याविषयी सखोल मार्गदर्शन करुन एमआयडीएसआर दंत रुग्णालयातील उपलब्ध विविध दंत उपचार पध्दती व सुविधा विषयी माहिती दिली. तसेच फिजीओथेरपी तज्ज्ञ डॉ. सुभाष खत्री यांनी विविध आजार आणि त्यातील फिजीओथेरपीचे महत्त्व सांगून एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयातील विविध उपचार पध्दती व उपलब्ध फिजीओथेरपी उपकरणांबद्दल माहिती दिली. यावेळी दंत आरोग्य, फिजिओथेरपी उपचार व सामान्य आरोग्याविषयी उपस्थित आशांनी तज्ज्ञांकडून सबंधीत आरोग्य शाखांत येणाऱ्या अडचणी बाबत माहिती करुन घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी मृणाल कुलकर्णी व मृदुला बिक्कड यांनी केले. तर आभार श्री ज्ञानोबा केंद्रे यांनी मानले या मेळाव्यासाठी लातूर महानगरपालिका हद्दीमधील आशा पर्यवेक्षिका, आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### संजीवनी परिवार आयोजित ॲप्टिट्यूड...

जैमुनीचे संचालक सुधाकर पाटील उपस्थित होते. रोशन नाईक यांनी प्रास्ताविक केलं तर चिराग पाटील यांनी सूत्रसंचालन केल. किशोर वझे यांनी सर्वांचे आभार मानले. चाचण्यांनंतर प्रत्येक विद्यार्थ्यांचा रिपोर्ट कार्ड बनवण्यात आलं. विद्यार्थी व आई वडिलांबरोबर समुपदेशनाची बैठक घेऊन प्रत्येक विद्यार्थी आणि पालक यांना समुपदेश व निरीक्षणे समजून सांगण्यात आली. एकूण ७८ विद्यार्थ्यांनी ही टेस्ट दिली.

यातील ६५ विद्यार्थ्यांचे समुपदेशन मागील दोन दिवसात करण्यात आले. १३ विद्यार्थ्यांनी पश्र्ळपश समुपदेशन स्वीकारले. मानसोपचार तज्ज्ञ व समुपदेशक अरुण नाईक यांनी प्रत्येक विद्यार्थी व पालक यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तर देऊन शंकेचं निरसन केलं. अरुण नाईकसर यांचे उत्तम पाटील यांच्या हस्ते संजीवनीच्या कापडी पिशव्या देऊन आभार मानण्यात आले या वेळी बोलताना सरांनी टीम संजीवनीचं कौतुक केलं. परिसरातील गुणवंत विद्यार्थी शोधून त्यावर लक्ष केंद्रित करणे हे स्टडी सेंटरचं उद्दिष्ट आहे असे सांगून, शेवटी आनंद पाटील यांनी सरांचे आणि उत्कृष्ट टीमवर्कबद्दल सर्वांचे आभार मानले.

### आपले वसतिगृह सांस्कृतिक शैक्षणिक...

यावेळी मंचावर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल प्रकल्प अधिकारी अरुण पवार, जैन इरिगेशनचे मिडिया विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट अनिल जोशी, जिल्हा कृषि अधीक्षक कुर्बान तडवी, प्रशांत माहुरे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी जावेद तडवी, प्रा. संदिप केदार, द इंडियन एक्स्प्रेसचे अनिल सोनवणे, बांभोरी गावाचे सरपंच बिऱ्हाडे तसेच गृहप्रमुख संतोष बच्चे,विजय गाडे, वासुदेव बच्चे, अंलका दाभाडे, मीनाकुमारी चौधरी हे उपस्थित होते. यावेळी इंदाई प्रकाशनचे देवेंद्र करकरे, वसंत राठोड, संतोष खोपडे, किशोर सोनवणे हेही उपस्थित होते. यावेळी प्रा. संदिप केदार, जैन इरिगेशनचे अनिल जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच पुढे बोलताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी विविध प्रकारचे उपक्रम ज्यात तुमची पकड आहे जसे मैदानी खेळ, अभ्यास, नृत्य, व्यक्तिमत्व विकास, वकृत्त्व कौशल्य आदी गोष्टीत सहभाग घ्यावा अशी प्रेरणादायी चर्चा विद्यार्थ्यासोबत जिल्हाधिकाऱ्यांनी केली. आदिवासी पेहरावासह पारंपरिक नृत्य सादर करून जिल्हाधिकाऱ्यांसह मान्यवरांचे स्वागत विद्यार्थ्यानी केले. प्रास्ताविक आदिवासी प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांनी केले.

### विरार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ...

चव्हाण, पदाधिकारी विलास जाधव, अमित गौतम, संजय चव्हाण, तसेच विश्वरत्न बुद्धिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप सुर्वे, उपाध्यक्ष विलास जाधव, खजिनदार सकपाळ, सतीश तांबे, पदाधिकारी सिद्धेश्वर खर्चे, सुधीर वाघमारे, विलास शिंदे, प्रभाकर पवार, अंकुश सावंत, तेजस सोनवणे, प्रमुख मार्गदर्शक हरेश्वर पाटील, समाजसेवक विजय पात्रे, सुरेश कदम, वैभव माळी, रवींद्र चव्हाण, नारायण थिटे परेश लोके व इतर कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री हरेश्वर पाटील, विलास जाधव व विजय पात्रे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उप प्राचार्य सुधीर वाघमारे यांनी केले.

### राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षेत...

निकाल मागील महिन्यात लागला असून शाळेचा निकाल १००% लागला आहे. आता शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली असून वाडा तालुक्यातून एकूण ५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. त्यातील ४ विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळा कोने येथील आहेत. पात्र विद्यार्थ्यामध्ये मुस्कान सुलतान पठाण, सानिका अमोल जाधव, वैष्णवी जगदीश कदम व सुजित अंकुश जाधव हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना महिन्याला एक हजार रुपये याप्रमाणे ४ वर्ष शिष्यवृत्ती मिळणार आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व इयत्ता ८ वी च्या वर्गाला मार्गदर्शन करणारे वर्ग शिक्षक सुनील शिंदे यांचा सत्कार वाडा तालुक्याचे माजी गटशिक्षणाधिकारी माननीय भगवान मोकाशी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित कोने शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंदाचे अभिनंदन भगवान मोकाशी यांनी केले आहे.

### वाडा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर...

शनिवार, रविवारी पार पडलेल्या क्रीडा स्पर्धकांचा व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचा शाळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन येथोचीत सत्कार करण्यात आला. संध्याकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सिद्धार्थ युवक मित्र मंडळाचे अध्यक्ष हेमंत थोरात, उपाध्यक्ष जयेश थोरात, सुमेध थोरात, सचिन कायकवाड, प्रा. किरण थोरात यांच्या नियोजनात कार्यक्रम यशवायरित्या पार पडला तर नम्रता वाघचौरे, अस्मिता जाधव, प्रीती थोरात व स्मितली थोरात आदी भगिनींचे सहकार्य लाभले.

21 TO 27 APRIL 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 4/19/2025 8:41 PM Page 1



# भाईंदर येथे २२ कोटी ३३ लाखांचे ड्रग्ज आणि मुद्देमाल जप्त




**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट परिसरात मोतीलाल नगरमध्ये मोठ्या प्रमाणावर परदेशातून मानवी तस्करीद्वारे कोकेन आणून त्याची विक्री करणार्या आंतरराष्ट्रीय ड्रग्सच्या कारभाराचा काशीमिरा गुन्हे शाखा-१ ने पर्दाफाश करत दोन नायजेरियन नागरिकांसह एका भारतीय महिलेला अटक केली आहे. यात पोलिसांनी १४ किलो ८६८ ग्राम कोकेन आणि कॅप्सूल जप्त करत २२ कोटी ३३ लाखांचा मुद्देमाल आणि रोख रक्कम जप्त केली आहे. या कारवाईमुळे ड्रग्स खरेदी-विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश होणार आहे. काशीमिरा गुन्हे शाखा -१ यांना गुप्त माहिती मिळाली की, भाईंदरमध्ये एक महिला मोठ्या प्रमाणावर कोकेन अंमली पदार्थ बाळगून विक्री करत आहे. त्यावरून १५ एप्रिल रोजी सापळा रचून सबिना शेख हिच्या घरात पथकाने छापा टाकून झडती घेतली. त्यात त्यांना १७ कोटी ७४ लाख ५० हजार किंमतीचे ११ किलो ८३० ग्रॅम वजनाचा कोकेन अंमली पदार्थ व ८० हजार रुपये रोख रक्कम मिळाली. त्या तपासादरम्यान अटक केलेल्या महिला आरोपीने कोकेन अंमली पदार्थ अँडी नावाच्या नायजेरीयन व्यक्तीने दिला असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी मिरारोडमधील हटकेश परिसरातील अँडी उबाबुडिके ऑनीईन्स (वय ४५ वर्ष, रा.मूळ नायजेरिया देश) याला अटक करुन त्याच्या ताब्यातून ३ कोटी ९० लाख रुपये किंमतीचा २ किलो ६०४.८ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ आणि १ लाख ४,४३० रुपये भारतीय चलनामधील रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी अँडी याच्याकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये तो कोकेन हा अंमली पदार्थ त्याची महिला साथीदार ख्रिस्ताबेल एंजेल (वय ३२ वर्ष रा. वसई पूर्व) हिच्याकडून घेत असल्याचे सांगत असल्याने तिला अटक केली. तिच्या ताब्यातून ६४ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा ४३३.२ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ तसेच १ लाख रुपये भारतीय चलनाची रोख रक्कम आणि नायजिरीयन चलनामधील १००० नायरा दराच्या १७४ नोटा, ५०० नायरा दराच्या ४८ नोटा आणि अमेरीकन चलनामधील १०० डॉलर दराच्या १४ नोटा असे परकीय चलन देखील हस्तगत करण्यात आले आहे. सदरील गुन्हयात आतापर्यंत दोन महिला आरोपींसह १ पुरुष आरोपीला अटक करण्यात आले आहे. त्यांच्याकडून १४ किलो ८६८ ग्रॅम वजनाचा २२ कोटी ३० लाख २० हजार रुपयांचा अंमली पदार्थ आणि २ लाख ८४ हजार ४३० रुपये दराची भारतीय चलन रक्कम, नायजेरीयन चलनामधील १००० नायरा दराच्या १७४ नोटा, ५०० नायरा दराच्या ४८ नोटा आणि अमेरीकन चलनामधील १०० डॉलर दराच्या १४ नोटा असे परकीय चलन आणि ४ फोन असा एकूण २२ कोटी ३ लाख ८४ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ आणि भास्कर पुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीराचे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, संदीप शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक पाटील, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, पोलीस हवालदार अश्विन पाटील, सुधीर खोत, सचिन हुले, पोलीस अंमलदार प्रशांत विसपुते, धिरज मेंगाणे, गौरव बारी, सौरभ इंगळे तसेच महिला सहा. फौजदार दिपाली जाधव व संतोष चव्हाण (सायबर गुन्हे शाखा) मसुब किरण आसवले यांनी केली आहे.

# प्लास्टिक कारखान्याला भीषण आग; कांदळवनही जळून खाक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर येथील प्लास्टिक साहित्याचा पुनर्वापर करणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.गुरुवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली. या आगीत कारखान्यातील साहित्य व बाजूच्या परिसरात असलेले कांदळवन जळून खाक झाले आहे. भाईंदर पश्चिम येथील मुर्धा गावातील मोकळ्या जागेत प्लास्टिक साहित्य बारीक करणारा एक कारखाना आहे. दरम्यान गुरुवारी दुपारच्या सुमारास या कारखान्यात आग लागल्याची घटना घडली. यात काही क्षणातच कारखान्यातील प्लास्टिक जळू लागल्याने आगीचे रौद्ररूपात रूपांतर झाले. त्यामुळे आजूबाजूच्या परीसरात मोठी खळबळ उडाली होती. याची माहिती स्थानिकांनी मिरा भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. जवळपास ९ गाड्यामधील पाण्याचा मारा केल्यानंतर ही आग नियंत्रणात आली.यात कोणतीही जीवितहानी झाली नसून यात संपुर्ण कारखाना जळून खाक झाला असल्याची माहिती पालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात आली आहे. या आगीच्या भडक्याने आजूबाजूच्या परिसरात प्रचंड प्रदूषण पसरले होते. भाईंदरमध्ये प्लास्टिक कारखान्याला आग लागल्याची माहिती मिळताच पालिकेचे अग्निशमन दल काही मिनिटाच घटना स्थळी दाखल



झाले होते. यावेळी राबवलेल्या बचावकार्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले.धक्कादायक बाब म्हणजे आग शांत झाल्यानंतर अग्निशमन विभागाला घटनास्थळावरून दहाहून अधिक घरगुती वापरातील सिलेंडर मिळून आले. सुदैवाने यातील एकही सिलेंडर न फुटल्यामुळे मोठा अनर्थ टळला असल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. भाईंदर पश्चिम येथील मुर्धा गावात खारफुटी क्षेत्रात भराव करून बेकायदेशीरपणे हा कारखाना उभारण्यात आल्याची बाब समोर आली आहे. तर या आगीत मोठ्या संख्याने कांदळवनाची झाडे जळून खाक झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या जागेची महसूल विभागाकडून देखील पाहणी करण्यात आली असून कारखानदाराविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# मीरा-भाईंदर शहरामध्ये बनावट मद्यविक्री? उत्पादन शुल्क विभागाकडून तीन मद्यविक्री वाईन शॉपला टाळे

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा भाईंदर शहरात बनावट मद्यविक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या बनावट मद्यविक्री प्रकरणी ठाणे उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करीत तीन मद्य दुकानांना टाळे ठोकले आहे. मिरा रोड येथील काशिमीरा आणि पेणकर पाडा भागात बनावट मद्यविक्री विक्रीचे प्रकरण काही दिवसापूर्वीच उजेडात आले होते. यातील आरोपी रामकेश सीताराम गुप्ता याची चौकशी केली असताना त्याने भिवंडी मधून ही मद्य येत असल्याची माहिती पोलिसांना दिली होती. त्यावरून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ठाणे युनिटने भिवंडी जिल्ह्यातील कोनगाव गावातील एका सदनिकेतून कार्यरत असलेल्या बनावट मद्याच्या फॅक्टरीचा पर्दाफाश केला होता. यामध्ये बिसलेरीच्या पाण्यात दारू मिळवून पुन्हा बॉटल सीलपॅक करण्याचा प्रकार केला जात होता. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरु ठेवल्यानंतर ही दारू संपूर्ण जिल्ह्यात विक्री साठी जात असल्याचे समोर आले. तर नवीमुंबई आणि भाईंदर येथे या मद्य बाटल्यांचे प्रमुख खरेदीदार असल्याची तक्रार उत्पादक शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यावरून मिरा भाईंदर मधील चेतन वाईन शॉप ची दोन दुकाने व दादर वाईन शॉप अशा तीन मद्यविक्री दुकानांना टाळे ठोकले असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश आल्यामुळे चेतन वाईन शॉप सील करण्यात आले आहे. यात बनावट मद्यविक्री केल्याची तक्रार असून त्याची पुढील तपास सुरू आहे, असे राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाचे उप पोलीस निरीक्षक खाडे यांनी सांगितले. मद्याच्या बाटल्यांची किंमती ही वाढल्या आहेत. प्रत्येक ब्रँड नुसार त्या किंमती घेतल्या जातात. मात्र पाणी किंवा भेसळयुक्त साहित्य टाकून बनावट मद्य तयार केले जात असल्याचे प्रकार घडत असल्याने एक प्रकारे ग्राहकांची फसवणूक होऊ लागली आहे. काही मद्याविक्रेते देखील अधिक नफा कमविण्याच्या नादात अशी विक्री करतात त्यांची तपासणी करून कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# पलावा येथे वृध्दाला साधू वेशात लुटणारे गुजरात, पुणे, सोलापुरचे भुरटे चोर अटकेत

**डोंबिवली/प्रतिनिधी**

डोंबिवली जवळील खोणी पलावा येथे बुधवारी सकाळी एका मोटारीतून आलेल्या तीन भुरट्या चोरांनी एका ७५ वर्षाच्या वृध्दाला लुटले. यामध्ये एक चोरटा साधू वेशात होता. या वृध्दाला बोलण्यात गुंतवुन साधू वेशातील इसमाने वृध्दाच्या गळ्यातील सोन्याची साखळी, अंगठी असा एका लाखाहून अधिक किमतीचा ऐवज घेऊन पसार झाले होते. मानपाडा पोलिसांनी मोठ्या कौशल्याने या तिन्ही भुरट्या चोरांना अटक केली आहे. हे तीन जण गुजरात, सोलापूर आणि पुणे भागातील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून वृध्दाचा लुटलेला सोन्याचा एक लाख २० हजार रूपये किमतीचा सोन्याचा ऐवज, गुन्ह्यासाठी वापरलेली मोटार कार पोलिसांनी जप्त केली आहे. माधव दिवाकर जोशी (७५) या वृध्दाची चोरट्यांनी काटई बदलापूर रस्त्यावरील खोणी पलावा भागातील रस्त्यावर बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान लुट केली होती.या तिन्ही इसमांना




पोलिसांनी कल्याण न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पोलिसांनी दिलेली माहिती, अशी की तक्रारदार माधव दिवाकर जोशी हे वृध्द खोणी पलावा भागात राहतात. खोणी पलावा भागातील वेटलॅन्ड पार्क परिसरातील भाजी बाजारात भाजीपाला खरेदीसाठी पायी चालले होते. त्यावेळी त्यांच्या समोरून एक मोटार आली. मोटारीत तीन जण होते. तिघेजण मोटारीतून उतरले. त्यापैकी एक जण साधु वेशात होते. या तिन्ही भुरट्यांनी माधव जोशी यांची बरीखुशाली विचारली. वृध्द वयात घ्यायची काळजी. आता कोठे चालले अशी विचारणा करत माधव दिवाकर जोशी यांचा विश्वास संपादन केला. माधव जोशी यांना बोलण्यात गुंतवून साधुच्या वेशातील भुरट्याने माधव जोशी यांना काही कळण्याच्या आत हातचलाखी करत त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी, बोटातील सोन्याची अंगठीही काढुन घेतली. तिन्ही भुरटे एकावेळी माधव जोशी यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्याशी लबाडी करण्याचा प्रयत्न करत होते. साधु आणि इतर भुरटे यांचा माधव यांच्या बरोबर संवाद सुरू असतानाच, भुरटे बोलत बोलत त्यांच्या मोटारीजवळ गेले. वृध्द आपला काढुन घेतलेला सोन्याचा ऐवज परत मागत होते. पण ते देण्याच्या मनस्थितीत नव्हते. तिन्ही भुरटे घाईघाईत त्यांच्या मोटारीजवळ गेले आणि कोणाला संशय येणार नाही, आपले पकडले जाऊ या भीतीने मोटारीत बसून पळून गेले. साधु वेशातील इसमांनी आपल्याला लुटल्याची तक्रार माधव जोशी यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात केली होती. पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे तिन्ही भुरट्यांना गुरुवारी अटक केली. त्यांच्याकडून चोरीचा ऐवज हस्तगत केला. पोलीस निरीक्षक राम चोपडे, दत्तात्रय गुंड, जयपाल गिरासे, साहाय्यक पोलीस निरीक्षक महेश राळेभात, संपत फडोळ, सागर चव्हाण, हवालदार राजेंद्रकुमार खिलारे, सुनील पवार, सचिन साळवी, विकास माळी, सोपान शेळके, गणेश भोईर, सुशांत पाटील, यल्लपा पाटील, गणेश बडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# वाडा नगरपंचाय कार्यालयावर मनसेची धडक



**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वाडा तालुकाध्यक्ष कांतीकुमार ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायत कार्यालयाचे मुख्य अधिकारी मनोज पष्टे यांना घेराव घालून वाडा शहरातील असणाऱ्या असंख्य समस्यांसाठी लेखी पत्र दिले आणि लेखी पत्र दिलेल्या प्रश्नाचे लेखी उत्तर येत्या दहा दिवसात मिळावे यासाठी पत्र व्यवहार करण्यात आले पत्रात केलेले उल्लेख हे सर्वसामान्य नागरिकांशी वाड्या शहरात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला माहित असणे गरजेचे आहे. आणि अत्यंत जिव्हाळ्याची प्रश्न उपस्थित केले आहेत. नगरपंचायतीने नगरपंचायतीचा निधी हा फक्त ठेकेदार आणि अधिकाऱ्यांचे केवळ उदरनिर्वाहासाठी खर्च केल्याचे निदर्शनास येत आहे याचा जाब विचारण्यासाठी कार्यकर्त्यासह धडक दिली. तालुकाध्यक्ष यांच्या सोबत देवेंद्र भानुशाली उपचिटणीस कामगार सेना महाराष्ट्र राज्य, वाडा तालुका अध्यक्ष स्वप्निल मोरे, वाडा शहराध्यक्ष मधुर म्हात्रे, वाडा तालुका महिला सेना अध्यक्ष उषाताई मोरे, मंगला निकम उप तालुकाध्यक्ष, आंबेकर ताई वाडा शहर उपाध्यक्ष, ओंकार साळुंखे वाडा उपशहर अध्यक्ष, शुभम आंबेकर वाडा शहर उपाध्यक्ष, प्रणय पाटील उपविभाग अध्यक्ष व सैनिक उपस्थित होते.

# घोडबंदर भागातील आदिवासी पाड्यांवर पाणी टंचाई; श्रमजिवी संघटनेचा हंडा मोर्चा

**ठाणे/प्रतिनिधी**

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्वच भागात पाणी टंचाईची समस्या गेल्या काही महिन्यांपासून जावणवत असतानाच, घोडबंदर भागातील आदिवासी पाड्यांवर ही समस्या अधिक तीव्र झाली आहे. त्यामुळे पाणी मिळावे, या मागणीसाठी श्रमजिवी संघटनेने बुधवारी महापालिकेच्या माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीवर हंडा मोर्चा काढला होता मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा संघटनेने यावेळी दिला. ठाणे महापालिका क्षेत्रात संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येते. घोडबंदर भागातील या उद्यानाच्या डोंगर पायथ्याशी आदिवासी पाडे आहेत. याठिकाणी पानखंडा, बाबनोली पाडा, कशेळीपाडा, देवाचापाडा, सातपाडा यासह इतर असे एकूण १३ आदीवासी पाडे आहेत. वनविभागाच्या हद्दीत असलेल्या या पाड्यांवर पाणी पुरवठा करण्यासाठी पालिकेने दोन वर्षांपुर्वी जलवाहिन्या टाकल्या पण, त्याद्वारे अद्यापही पाणी पुरवठा सुरू होऊ शकलेला नाही. तसेच



या भागांमध्ये पालिकेने कुपनलिकाही उभारलेल्या आहेत. मात्र, त्या कुपनलिकांना देखील आता पाणी येत नाही. या पाड्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. यंदा तीव्र उन्हामुळे ही समस्या आणखी बिकट झाली आहे. मे आणि जून महिन्यात ही समस्या अधिक बिकट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटनेने बुधवारी भर दुपारी उन्हात पालिकेच्या मानपाडा-माजिवडा प्रभाग समितीवर मोर्चा काढला. या मोर्च्यामध्ये आदीवासी महिलांनी रिकामा हंडा आणि मडका दाखवून प्रशासनाचा निषेध नोंदविला. यावेळी प्रभाग समितीचे उपायुक्त दिनेश तायडे यांना श्रमजीवीच्या वतीने निवेदन देखील देण्यात आले आहे. प्रत्येक कुटुंबाला त्याच्या राहत्या घरात नळ जोडणी तातडीने मंजुर करुन पाणी टंचाई मुक्त गावपाडे करण्यास कालबध्द कार्यक्रम ठरविण्यात यावा. जागेचा अडथळा येत असले अशा ठिकाणी कुपनलिकेद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. सुरु असलेल्या जलवाहीनीला वाढीव नळ जोडणी करण्यात येऊ नये, ज्या भागात जलवाहीन्या लहान आहेत, त्यांची क्षमता वाढवून पाणी पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून पाड्यांवरील समस्या सोडविण्याचे आश्वासन पालिकेतर्फे यावेळी देण्यात आले. या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा संघटनेने यावेळी दिला.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त भव्य चित्रकला स्पर्धा संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा येथील शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वाडा शहर व परिसरातील प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र, प्रथम द्वितीय व तृतीय, विद्यार्थ्यांना रोख बक्षीस उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे उपसभापती योगेश गवा, शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे सरचिटणीस विशाल कुलकर्णी सचिव योगेश विद्वांस, कोषाध्यक्ष जगदीश चिते, महेश वाळुंजकर शाळेचे मुख्याध्यापक सुनील पाडवी, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी, पालक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घोडबंदर रस्त्यावर १६ महिन्यांत १५हून अधिक जणांचा अपघाती मृत्यू

**ठाणे/प्रतिनिधी**

घोडबंदर रस्ता प्रवासासाठी खूपच धोकादायक बनला आहे. या रस्त्यावर मागील सोळा महिन्यांत १५हून जास्त जणांचा अपघातांमध्ये मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्यांमध्ये दुचाकीस्वार सर्वाधिक असून जखमींची संख्याही जास्त आहे. मृत्यूचा सापळा बनलेल्या घोडबंदर रोडच्या सध्याच्या स्थितीकडे प्रशासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत आहे. वाहतुकीच्या दृष्टीने घोडबंदर रोड खूप महत्त्वाचा असून जेएनपीटी येथून गुजरातच्या दिशेने तसेच इतर विविध ठिकाणांवरून मोठ्या संख्येने अवजड वाहने घोडबंदर रोड मार्गे ये-जा करत असतात. त्याचबरोबर गेल्या काही वर्षांत घोडबंदर रोड परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. या भागातील नागरीक याच रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे घोडबंदर रोडवर कायमच वाहनांची वर्दळ असली तरी जीवघेणा ठरू लागला आहे. या रस्त्यावर सातत्याने अपघात घडत आहेत. या दुर्घटनांमध्ये अनेकांचे बळी गेले आहेत. काहीवेळेला अपघाताला चालकाची चूक कारणीभूत असली तरी वाहतूक पोलिस, आरटीओ तसेच संबधित रस्ते प्राधिकरण अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देत नसल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

प्रवासासाठी असुरक्षित बनलेल्या या रोडवर २०२४मध्ये आणि जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत अपघातांमध्ये १७ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्व अपघात दुचाकींचे असून ट्रेलर, कंटेनर, ट्रक, कारसह अन्य वाहनांनी दुचाकींना धडक दिल्याने त्यामध्ये या सर्वांना प्राण गमवावे लागले आहेत. यातील बहुतांश अपघातांमध्ये वाहनचालकांनी अपघातग्रस्तांना मदत न करता पलायन केले असून इतर अनेक अपघातांमध्ये अनेजकण जखमी झाले आहेत. याबाबत वाहतूक शाखेतील एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यास विचारल्यानंतर वाहतुकीच्या नियोजनासाठी घोडबंदर भागात आवश्यक मनुष्यबळ तैनात केले आहे. ट्रॅफिक वॉर्डन दिले आहेत. चालकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. घोडबंदर रोडवर वाहतूक कोंडीपासून खड्डे आणि इतर बऱ्याच समस्या आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाचा निधी येतो. मात्र हा निधी खर्च केला जात नाही. परिणामी घोडबंदर रोडची दुरवस्था झाली आहे. मेट्रो, उड्डाणपुलाची कामे तसेच घोडबंदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. एकाच वेळी सर्व कामे हाती घेतल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे.

# पीकविम्याच्या मागणीसाठी ठाकरे शिवसेनेचा रास्ता रोको



**औसा/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना पीकविमा द्यावा, शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव द्यावा आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्यावी या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने लोदगा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन झाले. गेली तीन वर्षे झाली, शेतकऱ्यांना पीकविमा मिळत नाही. आता काही शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला आहे. बहुतांशी ९० टक्के शेतकरी पीकविम्यापासून वंचित आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.बैलगाडी, बैलासह एक तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, उपतालुकाप्रमुख चंद्रकांत तळेगावे, सर्कल प्रमुख श्रीहरी काळे, स्वरुप डिग्रसे, ज्ञानेश्वर उजळंबे, हनमंत करळे, सुनील खंडागळे, विवेक जाधव, अजीत काळे, नेताजी भोईबार, नवनाथ लांडगे, सचिन उजळंबे, मुकेश पारवे, स्वरूप काळे राम मुकदम, धम्मपाल गायकवाड यांच्यासह शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

21 TO 27 APRIL 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 4/19/2025 8:41 PM Page 1



# ऑलिम्पिकसाठी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सज्ज व्हावे-राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन



**पुणे/प्रतिनिधी**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा भारतात व्हाव्यात यासाठी प्रयत्न करीत असून, महाराष्ट्रातील आपल्या खेळाडूंना ऑलिम्पिकसाठी सज्ज व्हावे, 'विकसित भारत' बाबत चर्चा करत असतानाच आपण ऑलिंपिकमध्येही सर्वाधिक पदके मिळविण्याबाबतही विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराच्या समारंभात केले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पणनमंत्री जयकुमार रावल, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, राज्याचे क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात २०२२-२३ व २०२३-२४ असे दोन वर्षांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सोहळा दिमाखदार वातावरणात पार पडला. ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रदीप गंधे यांना, तर माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शकुंतला खटावकर यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्काराने गौरवित करण्यात आले. पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक विजेते आर्चर आदिती स्वामी, ओजस देवतळे यांच्यासह राज्यातील १५९ जणांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्करांने सन्मान करण्यात आला. महाराष्ट्राचा इतिहास पाहता उद्योग, शिक्षण, सामाजिक सुधारणा किंवा क्रीडा क्षेत्र असो महाराष्ट्राने देशाचे अनेक क्षेत्रात नेतृत्व केले आहे, असे प्रतिपादन करून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन पुढे म्हणाले की, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये आज क्रीडा संकुल उभे करण्यात राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने पुढाकार घेतला आहे. अशा वेळी शाळा महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांना खेळासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे खेळ हे ही एक करियर ची संधी आहे हे विध्यार्थ्यांमध्ये रुजविले पाहिजे. शिवछत्रपती पुरस्कार म्हणजे खेळाडूंच्या मेहनतीला राजमान्यता ...पान ६ वर

## वाहतूक पोलिसांच्या वर्दीत 'बॉडीवॉर्न कॅमेरे'



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन व्हावे व पोलीस कर्मचाऱ्याच्या सुरक्षेत भर पडावी म्हणून अधिकारी व अंमलदाराना आयुक्तालया तर्फे बॉडीवॉर्न कॅमेरे उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे रस्त्यावर घडणारी प्रत्येक घटना रेकॉर्ड केली जाणार असून वाहतूक नियंत्रण यासह अन्य बाबीवर लक्ष देण्यास मोठी मदत होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्विकारल्यानंतर प्रशासकीय यंत्रनांना शंभर दिवस कृती आराखड्याच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत नावीन्यपूर्ण व तंत्र स्नेही उपक्रम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना बॉडीवॉर्न कॅमेरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात जवळपास दोनशे कॅमेरे खरेदी केले जाणार आहे. तर पहिल्या टप्प्यात २० कॅमेऱ्यांचे वाटप पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी अधिकारी व अमलदारांना केले आहे. प्रामुख्याने बॉडीवॉर्न कॅमेरा हे उपकरण पोलिसांच्या वर्दीवर बसवले जात आहेत. यामुळे रस्त्यावर घडणारी प्रत्येक घटना यात सहजपणे रेकॉर्डिंग केली जाणार असून त्यामुळे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली जबाबदारी पार पाडण्यास मदत होणार असल्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सांगितले आहे. बॉडीवॉर्न कॅमेऱ्याचे वाटप हे रस्त्यावर कर्तव्य पार पाडणाऱ्या पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांना केले जाणार आहे. यात ऑडिओशिवाय व्हिडीओ रेकॉर्ड करण्याची सोय आहे. विद्युत चार्जिंग च्या मदतीने हे ...पान ६ वर

## लातुरात आयएमएचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी**

वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाचे संघटन असलेल्या इंडियन मेडिकल असोसिएशनचा लातूर जिल्ह्यातील नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाल्यानंतर पदग्रहण सोहळा बुधवार १५ रोजी अत्यंत थाटामाटात संपन्न झाला. माजी मंत्री आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते आदी मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरच्या अध्यक्षपदी डॉ. अभय कदम, सचिव डॉ. ऋषिकेश हरिदास तर महिला अध्यक्ष म्हणून डॉ. ज्योती सूळ, सचिव डॉ. प्रियंका डावळे, कोषाध्यक्ष डॉ. अपूर्वा चेपूरे, यांच्यासह उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, डॉ. वैशाली चपळगावकर, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. हनुमंत किणीकर, डॉ. आशिष चेपूरे, कोषाध्यक्ष डॉ. चांद पटेल, डॉ. दिपक गुगळे, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. राखी सारडा, डॉ. रचना जाजू, डॉ. अर्चना कोंबडे, डॉ. शारदा इरपतगिरे डॉ. चंद्रज्योती धनगे आदींची निवड करण्यात आली. यानंतर शहरालगत असलेल्या हॉटेल कार्नीव्हल या ठिकाणी आयोजित शानदार सोहळ्यात सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले माजी मंत्री अमित देशमुख यांनी मार्गदर्शन करताना शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यापारी केंद्र म्हणून ओळख असलेल्या लातूर येथील सर्व डॉक्टर मंडळी अत्यंत सेवाभावाने रुग्णांची सेवा करीत असल्यामुळे हे शहर आता आरोग्य सेवेचे केंद्र म्हणूनही विकसित होत आहे, लातूरची ही नवीन ओळख अधिक दृढ होण्यासाठी येथील लोकप्रतिनिधी म्हणून आपण सर्वतोपरी सहकार्य आणि प्रयत्न करीत आहोत, डॉक्टर मंडळींना कोणतेही अडचण येणार नाही यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा येथे उभारण्यात येत आहेत, लातूर आयएमएच्या मागणीवरून रुग्णालयाचा परवाना तीन वर्षाऐवजी तो पाच वर्षापर्यंत वाढवण्याची मागणी आपण सरकारकडे लावून धरली आहे, मुख्यमंत्र्यांनी ती मागणी तत्वता मान्य केली आहे त्यामुळे लवकरच तसा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रासाठी...पान ६ वर

## मोदी सरकारच्या अन्यायकारक निर्णयाविरुद्ध वसईत जोरदार निदर्शने

### जिल्हा काँग्रेसचे महामहिम राष्ट्रपतींना निवेदन




**वसई/प्रतिनिधी**

नेशनल हेराल्डची जुन्या मालमत्तेला मैनेज करण्यासाठी एक नॉट फॉर प्रॉफिट- सेक्शन -८ ची कंपनी बनवली गेली, ज्यामध्ये श्रीमती सोनिया गांधी व अन्य लोक सामील आहेत. यामध्ये ना डिविडेंड दिला जातो आणि कमर्शियल ट्रांजैक्शन करू शकत नाही. याला एक वेगळे व खोटे रूप देऊन खोटी केस बनवली गेली. याच श्रृंखलेमध्ये चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया झाली आहे. हा एक फेक मामला आहे, ज्यामध्ये बिलकुल तथ्य नाही. या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध काँग्रेस पक्ष आणि पक्षातील नेते मंडळीनी लढा देण्याचे ठरविले आहे. या प्रकाराविरोधत गुरुवार १७ एप्रिल २०२५ रोजी वसई विरार शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऑनील आल्मेडा यांच्या नेतृत्वात वसई तहसिलदर कार्यालयासमोर आंदोलन करून जोरदार निदर्शने करण्यात आली. आजच्या आंदोलनात पक्षाचे सर्व ब्लॉक अध्यक्ष, सर्व फ्रंटल सेलचे अध्यक्ष, जिल्हा कांग्रेस पदाधिकारी, कोर कॉनिटि सदस्य डॉक्टर डिनेश कांबळे,महिला कांग्रेस पदाधिकारी, माजी जिल्हाअध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, माजी यूथ कांग्रेस अध्यक्ष आणि मोठ्या प्रमाणात कांग्रेस कार्यकर्ते व जेष्ठ कार्यकर्ते सहभागी होते. यानंतर काँग्रेस पक्षातर्फे देशाच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांना वसई प्रांत अधिकारी यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. देशाच्या नेत्या खा. श्रीमती सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस पक्षाचे नेते खा. राहुल गांधी व इतर ज्येष्ठ नेतेमंडळी विरुद्ध सत्तेचा दुरुपयोग करून कोर्टामध्ये चार्जशीट दाखल करण्याचा मोदी सरकारचा निर्णय हा लोकशाही परंपरेला घातक आहे. अंततः याबाबत कोर्ट आपली स्पष्टता राखेल. या केसला राजकीय प्रतिशोधाच्या भावनेतून चालवले जात आहे, हे दुःखद आहे. आपण याची गंभीर दखल घेऊन केंद्रातील मोदी सरकारने चालवलेल्या खोट्या कारवाईला आळा घालून योग्य ते पाऊल ...पान ६ वर

## संजीवनी परिवार आयोजित ऑप्टिट्यूड टेस्ट यशस्वीपणे संपन्न



**वसई/प्रतिनिधी**

संजीवनी स्टडी सेंटर, भाऊसाहेब वर्तक विद्यामंदिर येथे मानसोपचार तज्ज्ञ व समुपदेशक अरुण नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी परिवार व जैमुनी सहकारी पतपेढी संयुक्त विद्यमाने ॲप्टिट्यूड टेस्टचं आयोजन करण्यात आलं होतं. ९वी ते १२वीच्या एकूण ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येकात नैसर्गिक क्षमता असते. वेळेवर ती ओळखणे, तिचा विकास करत जाणे हे ह्या टेस्ट उद्दिष्ट आहे. या मध्ये एकूण नऊ टेस्ट घेतल्या जातात. त्यामध्ये अमौखिक चाचणी, आवड, कल दर्शवणारी चाचणी, संख्यात्मक चाचणी, तर्क चाचणी इत्यादीचा समावेश असतो, अशी माहिती नाईक सरांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना दिली. प्रमुख पाहुणे म्हणून ...पान ६ वर

## विरार येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३४वी जयंती उत्साहात साजरी



**विरार/प्रतिनिधी**

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त विरार येथील विश्वराज हौसिंग कॉम्प्लेक्स व विश्वरत्न बुद्धिस्ट असोसिएशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी १० वाजता ढोल ताशांच्या आवाजात व बाबासाहेब आंबेडकरांच्या जयघोषात कॉम्प्लेक्सच्या आवारात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या प्रसंगी महिला व लहान मुलांच्या हातामध्ये संविधानाची प्रत देण्यात आली होती. सदर कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. तसेच शिका! संघटीत व्हा! आणि संघर्ष करा असा संदेश दिला. त्यानंतर महिलांसाठी हळदी कुंकूचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांसाठी व लहान मुलांसाठी संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गीतांवर महिला व लहान मुलांच्या नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच हरेश्वर पाटील, विलास जाधव आणि विजय पात्रे, सुधीर वाघमारे व नारायण थिटे यांनी भीम गीते गाऊन कार्यक्रमात रंगत आणली. या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा कांताताई पाटील, तसेच माजी नगरसेवक वसंत वरे, नरेंद्र पाटील आदी मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली. सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत भेट म्हणून देण्यात आली. अनेक समाजसेवक,पत्रकार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक विश्वराज हौसिंग कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष जयेश कुळकर्णी, सचिव संदेश तानवडे, खजिनदार राहुल ...पान ६ वर

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा कोनेची उत्कृष्ट कामगिरी



**वाडा/प्रतिनिधी**

केंद्र सरकारने इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेली शिष्यवृत्ती योजना आहे. इयत्ता ८ वी च्या अखेर आर्थिक दुर्बल घटकातील प्रतिभावंत विद्यार्थ्याचा शोध घेऊन बुद्धिवान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याचा दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरापर्यत शिक्षण घेण्यास मदत व्हावी आणि आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्याची उच्च माध्यमिक स्तरापर्यत होणारी गळती रोखावी हे या परीक्षेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सदर परीक्षेसाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा कोने येथील इयत्ता ८ वीच्या वर्गातील एकूण ५ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्या परीक्षेचा ...पान ६ वर

## आपले वसतिगृह सांस्कृतिक शैक्षणिक केंद्र बनवा -जिल्हाधिकारी

### जैन इरिगेशनतर्फे 'वेटिंग फॉर व्हिसा' पुस्तकाचे वाटप



**जळगाव/प्रतिनिधी**

ज्या वसतिगृहात आपण शिकत आहात त्या वसतिगृहाची ओळख ही आपल्या राबवलेल्या उपक्रमातून सांस्कृतिक शैक्षणिक केंद्र बनले पाहिजे. न्याय हक्क यासाठी आंदोलन राबवले पाहिजेच परंतु मिळत असलेल्या गोष्टीतून आपली सामाजिक, राजकीय, आर्थिक उन्नती केली पाहिजे असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणी जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी आपल्या भेटीला' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वेटिंग फॉर व्हिसा' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित प्रा. संदिप केदार अनुवादित इंदाई प्रकाशनने प्रकाशित केलेल्या ५०० पुस्तकाचे जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांच्या सौजन्याने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले. ...पान ६ वर

## वाडा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील सिद्धार्थ नगर येथे सिद्धार्थ युवक मित्र मंडळाच्या वतीने विश्वभूषण, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त वाड्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी(दि.११) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रबोधनात्मक अभिवादन सभेचे आयोजन केले होते. शनिवारी (दि.१२) विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (दि.१३) सांस्कृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर सोमवारी (दि.१४) विश्वभूषण, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सकाळच्या सुमारास बुद्ध वंदना घेण्यात आली यावेळी बौद्ध बांधव व भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. दरम्यान प्रबोधन सत्रात भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, रोशन पाटील, शिवसेनेचे तालुका अध्यक्ष निलेश पाटील, पत्रकार युवराज ठाकरे यांनी आपले मनोगत मांडले. मिलिंद वाघचौरे, ...पान ६ वर

## आशा स्वयंसेविका आरोग्य सेवेच्या खऱ्या आधारस्तंभ -डॉ.हनुमंत कराड



**लातूर/प्रतिनिधी**

शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्या घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यात आशा स्वयंसेविकांचे योगदान अतिशय मोलाचे असून त्या खऱ्या अर्थाने समाजाचे आरोग्य रक्षण करणारे आधारस्तंभ आहेत, असे मत एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केले. येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने लातूर महानगरपालिका हद्दीतील आशा स्वयंसेविकांसाठी एमआयटी येथील संत ज्ञानेश्वर घुमट येथे आयोजित अशा स्वयंसेवीका आरोग्य प्रशिक्षण मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. हनुमंत कराड बोलत होते. यावेळी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. एकनाथ माले, एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मुख्य लेखा ...पान ६ वर